cmyk

रांगोळीच्या सप्तरंगात सुखाचे दीप उजळु दे... लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख समृदीने भरू दे...!

दैनिक
# राज्य लोकतंत्र

लक्ष्मी पुजन निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७५ | मंगळवार, दि.२१ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### हरियाणामध्ये जाहीर केला देशातील सर्वाधिक ऊस दर

चंदिगढ : हरियाणा सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीची भेट दिली आहे. राज्य सरकारने दिवाळीच्या पूर्वसंध्येला उसाला प्रति क्विंटल ४१५ रुपये म्हणजेच प्रति टन ४,१५० रुपयांपर्यंत वाढ जाहीर केली. मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही दिवाळीची भेट असल्याचे म्हटले आहे. ऊस पिकासाठी जाहीर केलेला हा देशातील उच्चांकी ऊस दर असल्याचे राज्य सरकारने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे. लवकर तोडणीला येणाऱ्या ऊस वाणांचा दर प्रति टन ४ हजार रुपयांवरुन ४,१५० रुपये करण्यात आला आहे. तर उशिरा तोडणीला येणाऱ्या वाणांचा दर प्रति टन ३,९३० रुपयांवरून ४,०८० रुपयांपर्यंत वाढविण्यात आला. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे हरियाणा सरकारने देशातील उच्चांकी उसाचा दर जाहीर करुन एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे.

### आता औषधांवर ‘क्यूआर कोड’ अनिवार्य

पुणे : बनावट आणि निकृष्ट औषधांच्या विक्रीवर लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारने औषधांच्या वेष्टणावर ‘बारकोड’ आणि ‘क्यूआर कोड’ छापणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. लसी, प्रतिजैविके, मानसोपचारातील औषधे आणि कर्करोगावरील औषधांपासून या उपक्रमाची सुरुवात होणार आहे. अखिल भारतीय औषध विक्रेते व वितरक संघटनेने या निर्णयाचे स्वागत केले आहे. बनावट औषधांमुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून केंद्र सरकारने औषधपुरवठा साखळी अधिक पारदर्शक करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. औषधांच्या वेष्टणावर ‘क्यूआर कोड’ आणि ‘बारकोड’ छापणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे औषधाचा स्रोत, उत्पादन परवानगी आणि घटकांची माहिती ग्राहकांना मिळणार आहे. अखिल भारतीय औषध विक्रेते व वितरक संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे आणि सरचिटणीस राजीव सिंघल यांनी या निर्णयाचे स्वागत केले. या पद्धतीमुळे औषध उद्योगातील पारदर्शकता वाढेल.

### बिहारमध्ये काँग्रेसच्या वाट्याला नऊ जागा कमी

पाटणा : बिहारमध्ये काँग्रेसच्या वाट्याला ६१ जागा आल्याचे सोमवारी स्पष्ट झाले. त्यामुळे तो पक्ष मागील वेळेच्या तुलनेत यावेळी ९ कमी जागा लढवेल. बिहार विधानसभा निवडणुकीतील जागावाटपावरून विरोधकांच्या महाआघाडीतील घोळ कायम राहिला. त्यामुळे राजद, काँग्रेस हे प्रमुख घटक पक्ष किती जागा लढवणार ते समोर येण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल होण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत प्रतीक्षा करावी लागली. काँग्रेस ६१ जागा लढवण्यास राजी झाल्याची माहिती मिळाली. वाट्याला आलेल्या सर्व जागांवरील उमेदवार त्या पक्षाने जाहीर केले आहेत.

# ३ हेक्टरच्या वाढीव मर्यादेबाबत शासन निर्णय जारी !

## ६४८ कोटी १५ लाख रुपयांचा निधी वितरणास मान्यता

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारने घोषित केल्याप्रमाणे ३ हेक्टरच्या वाढीव मर्यादेबाबत शासन निर्णय घोषित केला आहे. यापूर्वी २ हेक्टर पर्यंत मदत केलेल्या ज्या खातेदारांना जमीन तीन हेक्टरपर्यंत असेल अशा शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून आज शासन निर्णय घोषित केला आहे. याद्वारे ६४८ कोटी १५ लक्ष ४१ हजार रुपये निधी वितरणास मान्यता दिली आहे. याबाबतची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली आहे.**

शासन निर्णयाद्वारे ३ हेक्टर ( ७.५ एकर) पर्यंत जमीन बाधित झालेल्या प्रत्येक शेतकऱ्यांना देखील विशेष बाब म्हणून मदत करण्यात असलेली असून या विशेष निर्णयाचा फायदा राज्यातील ६ लक्ष १२ हजार १७७ शेतकऱ्यांना होणार असून त्यांचे ६ लक्ष ५६ हजार ३१० हेक्टर क्षेत्र बाधित झालेले आहे. या शेतकऱ्यांना २ हेक्टर पर्यंतची मदत यापूर्वीच मंजूर करण्यात आलेली असून ही वाढीव मदत अतिरिक्त १ हेक्टर साठी आहे. गेल्या काही



दिवसात राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस झाला होता. या पावसामुळं अनेक भागात जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळालं होतं. अनेक ठिकाणी नदी नाल्यांना पूर आले होते. या पुराचं पाणी अनेकांच्या घरात शिरलं होतं. त्यामुळं संसार उघड्यावर होते. तर दुसऱ्या बाजूला जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यावर देखील मोठं संकट आलं होतं. अनेक शेतकऱ्यांची उभी पिकं आडवी झाली होती, तर काही शेतकऱ्यांची पिकाबरोबर जमिन देखील वाहूनगेली होता. त्यामुळं शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान या पुरामुळं झाल्याचं पाहायला मिळालं. आपातग्रस्त मृत व्यक्तीच्या वारसांना ४ लाख अर्थसाहाय्य मिळेल. ६० टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख आणि जखमी व्यक्ती रुग्णालयात दाखल असल्यास ५,४०० ते १६,००० पर्यंत मदत मिळणार आहे. पूर्णतः नष्ट झालेल्या घरांसाठी (पक्क्या/कच्च्या) सपाट भागात १.२० लाख, तर डोंगराळ भागात ▶▶ पान २ वर

# महसूल विभागाला ‘दिवाळी भेट’!

## ४७ अधिकाऱ्यांच्या बढत्या, राज्याला मिळाले नवे अपर जिल्हाधिकारी

मुंबई । प्रतिनिधी

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांसाठी मोठी ‘दिवाळी भेट’ जाहीर केली आहे. गेल्या १० वर्षांपासून रखडलेल्या पदोन्नत्यांचा मार्ग मोकळा करत, राज्याला आता ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आला.



सामान्य प्रशासन विभागाने १५ ऑक्टोबर रोजी दिलेल्या इतिवृत्तानुसार, आस्थापना मंडळ (क्रमांक २) ने अपर जिल्हाधिकारी संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांची निवडसूची वर्ष २०२५-२६ साठी तयार केली. त्यानुसार, अपर जिल्हाधिकारी ▶▶ पान २ वर

# पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाजाला जीआरचा फायदा होणार नाही!

## महसूल मंत्री बावनकुळे यांचा धक्कादायक अन खळबळजनक दावा



मुंबई । प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारची भूमिका ठाम असून, कोणाच्याही ताटातील वाटा काढून दुसऱ्याला दिला जाणार नाही,“ अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून तीन प्रमुख नेत्यांमध्ये वेगवेगळी मते असल्याचे निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले, २ सप्टेंबरचा शासन निर्णय न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे, त्यावर अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही. मात्र, हैद्राबाद गँझेटियर हे मराठवाडा आणि विदर्भ या भागापुरतेच लागू असून पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाजाला त्याचा फायदा होणार नाही. त्यामुळे, ओबीसी नेत्यांनी गैरसमज करुन घेऊ नये, ▶▶ पान २ वर

# आयुष आणि ॲलोपॅथी डॉक्टर समान दर्जाचे आहेत का?

## सुप्रीम कोर्टाने प्रश्न मोठ्या खंडपीठाकडे सोपवला, सेवानिवृत्तीचे वय अन् वेतनश्रेणीवरून वादंग

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी यांसारख्या वैद्यकीय चिकित्सा पद्धतींचा प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरांना सेवेच्या अटी, सेवानिवृत्तीचे वय आणि वेतनश्रेणी निश्चित करताना ॲलोपॅथी डॉक्टरांच्या बरोबरीने मानता येईल का, हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने आता मोठ्या खंडपीठाकडे सोपवला आहे.**

सरकारी रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये ॲलोपॅथीची प्रॅटीक्स करणाऱ्या डॉक्टरांपेक्षा आयुष डॉक्टरांसाठी सेवानिवृत्तीचे वेगळे वय असू शकते का, या प्रश्नावर उत्तर मागणाऱ्या याचिकांवर



१३ मे रोजी न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने आपला निर्णय राखून ठेवला होता. १७ ऑक्टोबर रोजी दिलेल्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले की, सेवा लाभांसाठी दोन्ही पद्धतींच्या डॉक्टरांना समान मानले जाऊ शकते की नाही, यावर मतभेद आहेत. त्यामुळे या प्रश्नावर अधिकृत निर्णयाची आवश्यकता आहे. आयुष डॉक्टरांना ॲलोपॅथी डॉक्टरांसारखे सेवानिवृत्तीचे लाभ आणि वेतनमान मिळू शकतात की नाही, यावर पूर्वीच्या निर्णयांमध्ये वेगवेगळे मत स्वीकारले गेले होते, ▶▶ पान २ वर

# बडतर्फ पोलिस अधिकारी रणजीत कासलेला अटक

बीड । प्रतिनिधी

बीड पोलिस दलातील बडतर्फ पोलिस अधिकारी रणजीत कासले याला अटक करण्यात आली आहे.



गुजरातमधील घर फोडीतील आरोपींना मदत केल्याच्या संशयावरुन कासलेला अटक करण्यात आली आहे. या आरोपींना मदत करणे किंवा इतर सहकार्य पुरवणे अशा स्वरूपाचा संशय गुजरात पोलिसांना असल्याकारणाने त्यांनी दोन दिवसापासून ▶▶ पान २ वर

### अटक झाल्यावर ‘पुष्पा’ चित्रपटामधील ॲक्शन

वेगवेगळ्या प्रकरणी आत्तापर्यंत सात गुन्हे रणजीत कासले याच्यावर दाखल आहेत. गुजरात पोलिसांचा हा आठवा गुन्हा आहे. गुजरात पोलिस घेऊन जाताना ‘बॉसला अटक झाली’ म्हणत कासलेने ‘पुष्पा’ चित्रपटामधील ॲक्शनही करून दाखविली.




# फटाक्यांचा स्फोट: आठ वर्षीय बालक गंभीर

बीड । प्रतिनिधी

**दिवाळीच्या उत्साहात निष्काळजीपणाचे गंभीर रूप समोर आले आहे. नागोबा गल्ली परिसरातील आठ वर्षीय राजेश राजेंद्रसिंह शिकलकरी या चिमुकल्याने न फुटलेल्या फटाक्यातील पावडर (बारूद) कागदावर काढून ती पुन्हा पेटवली. त्यावेळी बारूद पेटल्याने तीव्र ज्वाला निघाल्या आणि राजेशच्या चेहऱ्याला व डोळ्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेत त्याच्या कॉर्नियाला गंभीर जखम झाली असून दृष्टी गमावण्याची वेळ आली आहे.**

घटना रविवारी दुपारी घराजवळील अंगणात घडली.



न फुटलेल्या फटाक्यात काय आहे हे पाहण्याची बालसुलभ उत्सुकता राजेशला महागात पडली. स्फोट झाल्यानंतर घरच्यांनी त्याला तत्काळ बीड येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी त्याला औरंगाबाद येथील नेत्रतज्ज्ञांकडे हलविण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बालरोगतज्ज्ञ डॉ. संजय जानवळे यांनी पालकांना सावधतेचे ▶▶ पान २ वर




## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक : आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३८.५० क्विंटल | २,३०० | २,७६० | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ९२.५० क्विंटल | २,३०० | ३,२०० | २,६४४ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००० | ५,२१० | ४,६०५ |
| बाजरी: ४१.०० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५५८ |
| मुग: १.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| सोयाबीन: ५०९.५० क्विंटल | २,४५० | ४,१९० | ३,८८४ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,००० | ५,४०० | ४,७६६ |

cmyk

## अग्रलेख

# दुरावलेल्या मनांना अन नव्या नात्याला उजाळा देणारा दीपोत्सव !

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दिवाळी म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक एकतेचे प्रतीक आहे. गावातली मातीची घरे, अंगणातली रांगोळी, आणि शेतातून आलेल्या नव्या पिकांचा सुगंध यामुळे या सणाला एक वेगळीच गोडी प्राप्त होतो. शेतकऱ्यांसाठी दिवाळी म्हणजे नव्या पिकांचा, समृद्धीचा आणि कृतज्ञतेचा उत्सव. नुकतेच कापणी झालेले धान्य, उसाची गुऱ्हाळे आणि घरात तयार होणारी पुरणपोळी यामुळे गावात उत्साह पसरतो. परंतु, यंदाच्या वर्षी अवकाळी पावसाने बऱ्याच भागातील शेतकऱ्यांच्या या आनंदाला मोठा फटका दिला आहे. अनेक गावांमध्ये पिकांचे नुकसान झाले, आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील हास्य काहीसे मलिन झाले. तरीही, या कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचा धीर आणि कष्टाची जिद्द थक्क करणारी आहे. आपल्या अन्नदात्या शेतकऱ्यांनी वर्षभर राबून आपल्या ताटात अन्न आणले, आणि त्यांच्यासाठी आपण सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांच्या या कष्टाला आणि धैर्याला या शुभ दिनी सलामच करावा लागेल.

प्रकाशाचा आणि प्रेमाचा उत्सव दिवाळी... हा शब्द उच्चारताच मनात एक अपूर्व उल्हास निर्माण होतो. रात्रीच्या गडद काळोखात दीपांचा मंद प्रकाश, रांगोळ्यांचे रंगबेरंगी नक्षी, मिठाईंचा गोडवा आणि प्रियजनांच्या एकत्र येण्याचा आनंद यामुळे दिवाळी हा सण केवळ उत्सव नसून एक भावनिक संगम आहे. हा प्रकाशाचा उत्सव आपल्या जीवनात आशा, प्रेम आणि सामंजस्याची नवी किरणे घेऊन येतो. भारतातच नव्हे, तर जगभरात वसलेल्या भारतीयांच्या मनात हा सण एक विशेष स्थान राखतो. प्रत्येक घर, प्रत्येक मन आणि प्रत्येक क्षण या सणाच्या रंगात रंगून जातो.दिवाळी म्हणजे फक्त पणत्या लावणे किंवा फटाक्यांची आतषबाजी नाही; हा एक आंतरिक प्रवास आहे. रामायणातील प्रभू रामचंद्रांचा रावणावर विजय आणि त्यांचे अयोध्येत परतणे याचे प्रतीक म्हणून आपण हा सण साजरा करतो. हा विजय केवळ बाह्य युद्धाचा नाही, तर अंतर्मनातील अंधारावर प्रकाशाचा विजय आहे. प्रत्येक दीपक आपल्याला सांगतो की कितीही कठीण परिस्थिती असली, तरी आशेचा एक किरण नेहमीच मार्ग दाखवतो. या सणाच्या निमित्ताने आपण आपल्या मनातील नकारात्मक विचार, द्वेष आणि भय यांना निरोप देतो आणि प्रेम, करुणा आणि समजूतदारपणा यांना आत्मसात करतो.दिवाळीच्या तयारीतच या सणाचा खरा आनंद दडलेला आहे. घराची स्वच्छता, रंगरंगोटी, नव्या वस्त्रांची खरेदी, रांगोळ्यांचे नक्षीकाम आणि मिठाईंचा सुगंध यामुळे घरात एक उत्साहाचे वातावरण निर्माण होते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सगळ्यांना या तयारीत सहभागी होण्याचा आनंद मिळतो. बाजारातली गर्दी, दुकानांमधील चमचमणाऱ्या वस्तू, आणि मित्र-नातेवाईकांना भेटण्याची ओढ यामुळे दिवाळीचा माहोल आधीच रंगत जातो. विशेषत:, कुटुंबातील स्त्रियांच्या हातचे लाडू, चकली, शंकरपाळे आणि करंज्या यांचा स्वाद तर जिभेवर रेंगाळत राहतो. प्रत्येक कुटुंबात या मिठाईंच्या पाककृतींची स्वत:ची कहाणी असते, जी पिढ्यानपिढ्या पुढे जाते.दिवाळी हा सण सामाजिक बंधांना दृढ करणारा आहे. या काळात आपण एकमेकांना भेटायला जातो, शुभेच्छा देतो आणि प्रेमाने मिठाईची देवघेव करतो. कित्येक वर्षांनी भेटणारे मित्र, नातेवाईक यांच्या गप्पांमुळे घरात हास्याचा झरा वाहू लागतो. हा सण आपल्याला एकमेकांशी जोडतो, दुरावलेल्या मनांना जवळ आणतो आणि नव्या नात्यांना जन्म देतो. दिवाळीचा आणखी एक सुंदर पैलू म्हणजे त्यामागील सामाजिक संदेश. हा सण आपल्याला दानधर्माची, परोपकाराची आणि सामाजिक जबाबदारीची आठवण करून देतो. अनेक कुटुंबे या काळात गरजूंना मदत करतात, अन्नदान करतात आणि आनंद वाटतात. खरा आनंद हा फक्त स्वत:साठी जगण्यात नाही, तर इतरांना आनंद देण्यात आहे, हे दिवाळी आपल्याला शिकवते. आजच्या आधुनिक काळात, जेव्हा आपण तंत्रज्ञानात आणि व्यस्त जीवनात गुरफटत चाललो आहोत, तेव्हा हा सण आपल्याला थांबायला, विचार करायला आणि आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवायला भाग पाडतो.पर्यावरणाचा विचार करताना, आजकाल अनेकजण इको-फ्रेंडली दिवाळी साजरी करतात. मातीच्या पणत्या, नैसर्गिक रंगांनी बनवलेल्या रांगोळ्या आणि फटाक्यांऐवजी दीपोत्सव यांसारख्या पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब वाढत आहे. हे बदल स्वागतार्ह आहेत, कारण आपण आपल्या भावी पिढ्यांसाठी ही सुंदर परंपरा आणि निसर्ग दोन्ही जपायला हवेत. आपल्या उत्सवातून पर्यावरणाला हानी पोहोचवण्याऐवजी, आपण निसर्गाशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.दिवाळीचा खरा अर्थ आहे जीवनात आनंद शोधणे आणि तो वाटणे. हा सण आपल्याला सांगतो की प्रत्येक अंधारानंतर उजेड येतोच. आपल्या जीवनातील आव्हाने, दु:ख आणि निराशा यांच्यावर मात करून आपण नव्या आशेने पुढे जाऊ शकतो. प्रत्येक पणती आपल्याला एक नवे स्वप्न पाहायला शिकवते, प्रत्येक रांगोळी आपल्याला सौंदर्याची जाणीव करून देते आणि प्रत्येक मिठाई आपल्याला प्रेमाची गोडी अनुभवायला शिकवते. या दिवाळीत, आपण सर्वांनी आपल्या मनातील दीप प्रज्वलित करूया. आपल्या जीवनात आणि इतरांच्या जीवनात आनंद, प्रेम आणि प्रकाश पसरवूया. कारण, दिवाळी हा फक्त एक सण नाही; तो आहे एक भावना, एक विश्वास आणि एक नव्या सुरुवातीचा उत्सव. चला, या दिवाळीला आपण सर्व मिळून हा आनंद साजरा करूया आणि आपल्या जीवनाला अधिक सुंदर बनवूया.

## मूळ ओबीसींना निवडणुकीत फटका बसणार- वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

**ओबीसीमधून ज्या मराठ्यांनी प्रमाणपत्र मिळवले आहे ते सगळ्या जागा घेऊन जातील. निवडणुकांमध्ये मूळ ओबीसीला फटका बसणार आहे, त्यांचा माणूस स्थानिक निवडणुकांमध्ये दिसणार नाही. यांचे काम बळी तो कान पिळी असे होणार,असे वक्तव्य काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे.**

समाज मोठा आहे मात्र, ओबीसीतील नेत्यांच्या निवडणुकांचे आरक्षण संपले आहे. आम्ही आकडेवारीनुसार स्थानिक निवडणुकानंतर दाखवून देऊ. यापासून जे लोक दोन तारखेच्या जीआरमुळे नुकसान होत नाही असे म्हणत आहेत, त्यांनी याचा विचार करावा. कोण काय म्हणतात त्याच्याशी देणेघेणे नाही. पहिल्यांदा पात्र हा शब्द होता तो काढण्यात आला आहे. त्यामुळे नातेसंबंध, एखाद्याला ओबीसीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याचा वापर तो कुठेही करू शकतो. हे सध्या सत्तेमधील असलेल्या मंत्र्यांना समजत नसेल तर त्यांच्या बुद्धीची कीव करावी वाटते. कारण एकदा प्रमाणपत्र भेटल्यावर त्याचा वापर कुठेही केला जाऊ शकतो. जीआर जरी चार जिल्ह्यासाठी असला तरी, त्या प्रमाणपत्राचा वापर करून महाराष्ट्रात कुठेही नोकरी मिळू शकते. नोकरीसह आर्थिक सवलती घेऊ शकतो. मराठा आरक्षणाच्या संदर्भात काढलेला जीआर रद्द करायला पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

## 'भारत क्लॉथ स्टोअर्स' समोरील बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक ठप्प

अंबड । प्रतिनिधी

**जालना बीड मुख्य मार्गावर अंबड येथे भारत क्लॉथ स्टोअर्स या नामांकित कापडाच्या दुकानासमोर ग्राहकांच्या दुचाकी आणि इतर वाहनांच्या बेशिस्त व अनधिकृत पार्किंगमुळे परिसरात तीव्र वाहतूक कोंडीची समस्या नित्याची झाली आहे. रस्त्यावरच पार्किंग असल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी होत आहे. तसेच या भारत दुकान समोरील या पार्किंगमुळे पादचाऱ्यांसह इतर वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून, अपघाताचा धोकाही वाढला आहे. तसेच या भारत दुकानांमध्ये बारा तास कामगारांकडून काम करून घेतल्या जात आहे याप्रकरणी कामगार अधिकारी यांनीही चौकशी करणे गरजेचे आहे असे पण बोलल्या जात आहे.**



अंबडच्या वर्दळीच्या रस्त्यावर 'भारत क्लॉथ स्टोअर्स' हे मोठे दुकान असल्याने येथे ग्राहकांची सतत गर्दी असते.दुकानात येणारे ग्राहक आपली वाहने,विशेषत:दुचाकी, दुकानाच्या अगदी समोर रस्त्याच्या कडेला,आणि काही वेळा थेट रस्त्यावरच उभी करतात.यामुळे रस्ता अरुंद होतो आणि दोन मोठी वाहने एकाच वेळी मार्गक्रमण करू शकत नाहीत.परिणामी,दुकानाजवळ वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. सायंकाळच्या वेळी,तसेच सुट्ट्यांच्या दिवशी परिस्थिती अधिक बिकट होते.वाहतूक पूर्णपणे ठप्प होऊन वाहनचालकांना आणि स्थानिकांना तासन्तास खोळंबून राहावे लागते.या बेशिस्तपणामुळे मुख्य रस्ता असूनही गल्लीबोळासारखी स्थिती निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.एका नागरिकाने सांगितले की,''हे मोठे दुकान असले तरी वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. दुकानाचे व्यवस्थापन यावर काहीच उपाययोजना करत नाही आणि वाहतूक पोलीसही याकडे दुर्लक्ष करत आहेत.''या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिक करत आहेत.'भारत क्लॉथ स्टोअर्स'च्या व्यवस्थापनाने त्यांच्या ग्राहकांसाठी योग्य पार्किंगची सोय उपलब्ध करून देणे किंवा पर्यायी जागा दाखवणे महत्त्वाचे आहे, तसेच स्थानिक वाहतूक पोलिसांनी या भागात नियमित गस्त घालून बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांवर कठोर दंड आकारणी करावी,अशी अपेक्षा आहे. प्रशासनाने यावर तातडीने लक्ष देऊन वाहतूक कोंडीची ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## निवडणूक हरल्यामुळे बच्चू कडूंना 'फ्रस्ट्रेशन' - माणिकराव कोकाटे

नंदुरबार। प्रतिनिधी

**प्रहार संघटनेचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यापेक्षा आमदारांना कापा असे भडकाऊ वक्तव्य केले आहे. याचे पडसाद आता उमटत आहेत. क्रिडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी बच्चू कडू यांचे वक्तव्य म्हणजे बालिशपणा आहे अशी त्यांच्या विधानाची खिल्ली उडवली आहे. बच्चू कडू हे विरोधी पक्षात आहे निवडणूक हरलेले आहे त्यामुळे फ्रस्ट्रेशनमधून वेडे वाकडे वक्तव्य करतात. त्याकडे जास्त लक्ष देण्याची गरज नाही असेही कोकाटे म्हणाले.**

प्रहार संघटनेचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून संताप व्यक्त करताना एक अत्यंत वादग्रस्त आणि भडकाऊ आवाहन केले आहे. आत्महत्या करण्याऐवजी थेट एखाद्या आमदाराला कापून टाकण्याचा किंवा सार्वजनिक ठिकाणी विवस्त्र होऊन आंदोलन करण्याचा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे. त्यांच्या या विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. सरकार जर शेतकऱ्यांच्या बरोबर नसते तर ३७ हजार कोटींच्या पॅकेज जाहीर केलेच नसतं. सरकारने केलेली मदत मोठी असली तरी शेतकऱ्यांच्या अपेक्षा जास्त आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहे पण सरकार म्हणून जे काम देवेंद्र फडणवीस सरकारने करायला पाहिजे ते केले आहे. मतदारयादी मध्ये जर घोळ असतील तर विरोधी पक्षातील कार्यकर्ते काय झोपा काढतात का ? कुठल्याही निवडणुकीत मतदार यादी मध्ये हरकत घेण्याची मुदत असते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयां नंतर हे जागे झाले. त्याच्या अगोदर त्यांना मतदार यादीत घोळ का जाणवला नाही. आमचे कार्यकर्ते सजग असल्याने मतदार यादी मधला घोळ त्यांनी शोधून काढला आहे. आमच्याकडे बुथवर कार्यकर्ते आहे त्यांच्याकडे बुथवर कार्यकर्तेच नाही. त्यामुळे विरोधी पक्ष करत असलेले हे सर्व आरोप राजकीय प्रेरित आरोप आहेत. अशी टीकाही कोकाटे यांनी केली.

## परळी : लक्ष्मीपूजनानिमित्त प्रभाग ९ ते १७ च्या मुलाखती शुक्रवारी

### धनंजय मुंडेंनी प्रभाग १ ते ८ मधील इच्छुक उमेदवारांच्या घेतल्या मुलाखती

परळी वै । प्रतिनिधी

परळी नगर परिषदेच्या प्रस्तावित निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेणे सुरू असून उद्या (ता. २१) रोजी होणाऱ्या प्रभाग क्र. ९ ते १७ च्या मुलाखती लक्ष्मीपूजन व त्यानंतर नियमितपणे दिल्या जाणाऱ्या व्यापार पेठेतील शुभेच्छा भेटीच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आल्या असून या मुलाखती उद्या ऐवजी शुक्रवारी (ता. २४) रोजी सकाळी ११ ते पाच या वेळेत विशेष शासकीय विश्रामगृह परळी येथे होतील, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष परळी यांच्या वतीने देण्यात आली आहे. आ. धनंजय मुंडे यांनी आज दिवसभर प्रभाग क्र. १ ते ८ मधील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती स्वतः घेतल्या. दरम्यान सध्या दिवाळी सुरू असून उद्या लक्ष्मीपूजन हा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. तसेच याच दिवशी दरवर्षी धनंजय मुंडे हे परळी वैद्यनाथ शहरातील व्यापार पेठेत भेटी देऊन सर्व व्यापारी बांधवांना शुभेच्छा देत असतात. त्या पार्शवभूमीवर सदरील प्रस्तावित मुलाखती या शुक्रवार पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत. दरम्यान उद्या (ता. २१) लक्ष्मीपूजन नंतर धनंजय मुंडे हे सायंकाळी पाच वाजल्यापासून परळी वैद्यनाथ शहरातील व्यापार पेठेत भेटी देण्यासाठी जाणार आहेत, असेही कळवण्यात आले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यानंतर राजश्री उमरे पाटील यांचे उपोषण मागे

### कोरडेवाडी साठवण तलावासह विविध मागण्यांसाठी सोळा दिवसांपासून सुरू होते आंदोलन

केज । प्रतिनिधी

**कोरडेवाडी साठवण तलावासह विविध मागण्यांसाठी सुरू असलेले राजश्री उमरे पाटील यांचे आमरण उपोषण अखेर सोळाव्या दिवशी सोमवारी (दि.२०) संपुष्टात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लेखी स्वरूपात कारवाईचे पत्र देत मागण्यांचा विचार होणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले. ३ ऑक्टोबरपासून राजश्रीताई उमरे पाटील या धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानतर्फे कोरडेवाडी येथे उपोषणाला बसल्या होत्या.**




कोरडेवाडी साठवण तलावासाठी पाण्याचे प्रमाणपत्र देणे, अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ५० हजारांची मदत, ज्ञानराधा बँकेच्या मालमत्तेचा लिलाव करून ठेवीदारांना पैसे परत करणे, शेतकऱ्यांची कर्जमाफी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फी माफी अशा मागण्या त्यांच्याकडून करण्यात आल्या होत्या. या मागण्यांवर १७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात राजश्रीताई, बाळराजे आवारे पाटील, कार्यकर्ते आणि गावकऱ्यांची बैठक झाली. त्यानंतर १८ ऑक्टोबरला जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाईसंबंधी लेखी पत्र दिले. त्यात कोरडेवाडी परिसरात ३ ते ४ साखळी साठवण तलावांच्या स्थळ निश्चितीसाठी सर्वेक्षण पथक गठित करून ७ नोव्हेंबरपर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात संबंधित बैठकीचे आयोजन होणार आहे. याशिवाय ज्ञानराधा मल्टिस्टेट बँक प्रकरणी सक्षम प्राधिकारी नेमून विशेष न्यायालयात कार्यवाही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. या लेखी आश्वासनानंतर नायब तहसीलदार आशा वाघ-गायकवाड यांच्या हस्ते पाणी पिऊन राजश्री उमरे पाटील यांनी उपोषण मागे घेतले. दरम्यान, राजश्री यांनी उपोषण सोडताच ग्रामस्थांच्या डोळ्यात अश्रू तरळले. महिलांनी हंबरडा फोडला. त्यांना अ‍ॅम्ब्युलन्समधून उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. या आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनी तहसील कार्यालयात बैलगाडी जाळणे, तलावात उतरून जलसमाधी आंदोलन, तसेच सहा तासांचा रस्ता रोको अशा तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबला होता. काही आंदोलकांनी आत्मदहन आणि विषप्राशनाचाही प्रयत्न केल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली होती.

## पान ६ वरून...

### क्रांतिकारी लाईनस्टाफ

अध्यक्ष श्री. नंदकिशोर काळे, श्री. महारुद्र जिरेकर, श्री. लहू वाघमारे, श्री. शहानवाज शेख, श्री. संदीप पारखे, श्री. भागवत जाधव, श्री. कल्याण माखले,श्री अमोल पवार , श्री.बारटक्के, श्री दोडके, श्री जाधव,श्री भागवत जाधव, श्री नितीन काचमांडे ,श्री संदीप पारखे, श्री कल्याण माखले, श्री महादेव गवते, श्री बाळासाहेब धुमाळ, श्री दत्तात्रय बिबे ,श्री वैभव पवार, श्री रामदास गिरी, श्री महेश टेकाळे , श्री ऋषिकेश गदादे ,श्री समीर शेख, यांची उपस्थिती लाभली. या कामगार मेळाव्याच्या निमित्ताने क्रांतिकारी लाईनस्टाफ सेनेचे धोरण स्वीकारून शेकडो लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांनी इतर संघटनांमधून आपल्या हक्काच्या संघटनेत जाहीर प्रवेश केला. संघटनेच्या या वाढलेल्या बळाचे उपस्थितांकडून स्वागत करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी संघटना अधिक जोमाने काम करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

------------

### वडवणी येथे बळीराजा

समितीच्या वतीने करण्यात आले आहे या महोत्सवाचे हे ३ वर्ष आहे. सार्वजनिक सत्यधर्म,सत्यशोधक समाज संघ,एस.एफ.आय.,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती , डॉ. आंबेडकर चळवळ,मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड,वस्ताद साळवे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मित्र डॉ. अब्दुल कलाम,फातिमा शेख मित्र मंडळ सहभागी होणार आहेत तसेच तुम्ही आम्ही आणि वडवणीकर मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सम्राट बळीराजा महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

-----------

### बालस्वरांनी उजळली

क्षीरसागर, जेष्ठ गायक भरतअण्णा लोळगे, जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, दिपक मुळे, वासुदेव काजळे, सुदर्शन धुतेकर, प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमविचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, डॉ. राहुल सोनवणे, प्रा. दिपक जमदाडे, प्रा. मिलींद शिवणीकर, प्रा. सुरेश थोरात यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुराधाताई चिंचोलकर, नामदेव साळुंके, अमित गाडे, बाबासाहेब कांबळे, विजय राख यांनी सहकार्य केले.

## पान १ वरून...

### ३ हेक्टरच्या वाढीव मर्यादेबाबत

१.३० लाख आणि अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी ६,५०० (पक्के) ते ४,००० (कच्चे) पर्यंत मदत दिली जाईल. झोपडीसाठी ८,००० आणि गोठ्यासाठी ३,००० ची मदत मिळणार आहे.जिरायत पिकांसाठी ८,५०० प्रति हेक्टर, बागायत पिकांसाठी १७,००० प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांसाठी २२,५०० प्रति हेक्टर (जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मर्यादेत) मदत मिळेल. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढण्यासाठी १८,००० प्रति हेक्टर, तर जमीन खरडून गेली असल्यास (केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना) ४७,००० प्रति हेक्टर मदत जाहीर करण्यात आली आहे.

-----------

### पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी

असेही ओबीसी उपसमितीचे प्रमुख असलेल्या बावनकुळे यांनी स्पष्ट केले. सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा आणि ओबीसी समाज आमने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. ओबीसी नेत्यांनी २ सप्टेंबरचा शासन आदेश हा ओबीसींच्या आरक्षणावर घाला घालणारा असल्याचं म्हटलं. त्याच, अनुषंगाने बीडमध्ये ओबीसींचा महाएल्गार मेळावा देखील संपन्न झाला. तर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून मनातील खंत आक्रमक व भावनिकपणे बोलून दाखवली. आता, यासंदर्भात बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी, कोणच्याही ताटातील दुसऱ्या कोणाला दिले जाणार नाही याबाबत नेत्यांनी खात्री बाळगावी, असे म्हटलं आहे. राज्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी केलेल्या या खळबळजनक दाव्याने राज्यामध्ये विशेषता मराठा समाजातून काय प्रतिक्रिया येतात याकडे लक्ष लागले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी निजाम गॅझेटसह सातारा गॅझेट लागू करण्याची मागणी केली होती जी सरकारने मान्य केली होती. मात्र आता पश्चिम महाराष्ट्रात जर हा जीआर लागू होत नसेल तर सरकारने जाहीर केलेले आरक्षण मराठा समाजासाठी उपयोगी ठरणारे नाही. ओबीसी समाजाकडून वाढता दबाव लक्षात घेता सरकार आपली भूमिका बदलत आहे की काय अशी शंका या निमित्ताने उपस्थित होत आहे. आता बावनकुळे यांच्या या प्रतिक्रिये नंतर मनोज जरांगे पाटील आणि अखिल मराठा समाज यांच्याकडून काय प्रतिक्रिया येते हे पाहावे लागेल.

-----------

### महसूल विभागाला

(गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-१ ७८,८००- २,०९,२००/-) संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) या संवर्गात तात्पुरत्या स्वरूपात नियमित पदोन्नती देण्याची शिफारस करण्यात आली होती. आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार ही निवडसूची २०२५-२६ साठी तयार करण्यात आली होती.या पदोन्नत अधिकाऱ्यांना ३० दिवसांच्या आत नवीन पदावर रुजू होणे बंधनकारक आहे. या मुदतीत रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे शासनाने स्पष्ट केले आहे. रुजू झाल्याचा अहवाल त्वरित कळवावा लागणार आहे.या घोषणेपूर्वी महसूलमंत्री बावनकुळे यांनी सुमारे १६०० अधिकारी-कर्मचाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. महसूल विभाग अधिक जनताभिमुख, पारदर्शी आणि कार्यक्षम व्हावा, असे आवाहन करत त्यांनी 'दीपपर्वा'च्या निमित्ताने या कार्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

--------------

### बडतर्फ पोलिस अधिकारी

रणजीत कासलेला अटक करण्यासाठी शोध मोहीम सुरू होती. लातूर पोलिस त्याचबरोबर गुजरात पोलीस यांनी एकत्रित केलेल्या मोहिमेमुळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रणजीत कासले यास ताब्यात घेतले आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यातील कागदपत्राची पूर्तता करून सहा जणांच्या पथकाने रणजीत कासले याला गुजरात येथील सुरत भागातील पाल पोलीस स्टेशनकडे घेऊन गेले आहेत. दरम्यान, बडतर्फ झाल्यानंतर रणजीत कासलेने मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्हिडीओ करत अनेक खुलासे केले होते. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि त्यानंतर वाल्मीक कराड याबाबतच्या अनेक चित्रफिती सोशल मीडियावर रणजीत कासलेने व्हायरल केल्या होत्या. ज्याची चर्चा संपुर्ण महाराष्ट्रात झाली होती.

----------

### आयुष आणि अ‍ॅलोपॅथी डॉक्टर

असे न्यायालयाने स्पष्ट केले. खंडपीठाने असेही नमूद केले की, राज्यांच्या या युक्तिवादाकडे दुर्लक्ष करता येणार नाही की, (अ‍ॅलोपॅथिक डॉक्टरांचे) सेवानिवृत्तीचे वय वाढवण्याचा उद्देश केवळ जनतेवर उपचार करण्यासाठी पुरेसे अनुभवी डॉक्टर उपलब्ध असावेत हा होता. अ‍ॅलोपॅथीमध्ये डॉक्टरांची जी कमतरता आहे, ती स्वदेशी चिकित्सा पद्धतींमध्ये नाही, विशेषत: जेव्हा स्वदेशी चिकित्सा पद्धतींचे डॉक्टर महत्त्वाच्या जीवनावश्यक वैद्यकीय आणि शल्यचिकित्सेची (सर्जिकल) काळजी घेत नाहीत. आमच्या मते, या मुद्द्यावर एक अधिकृत निर्णय होणे आवश्यक आहे आणि म्हणूनच आम्ही हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे पाठवत आहोत. रजिस्ट्रीला (नोंदणी कार्यालयास) निर्देश देण्यात येतात की, हे प्रकरण प्रशासकीय बाजूने भारताच्या सरन्यायाधीशांच्या समोर ठेवावे.

---------

### फटाक्यांचा स्फोटः आठ

आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, ''फटाके वाजवताना मोकळ्या जागेत, ज्वलनशील वस्तूंपासून दूर आणि मोठ्यांच्या देखरेखेखालीच फटाके फोडावेत. फटाके फोडताना नेहमी पायात चप्पल किंवा बूट घालावेत व डोळ्यांचे संरक्षण करण्यासाठी चष्मा वापरावा.'' डॉ. जानवळे यांनी पुढे सांगितले की, फटाक्यांची चुकीची विल्हेवाट टाळा. वापरलेले फटाके पूर्णपणे थंड झाल्यावरच वाळूच्या बादलीत किंवा पाण्यात टाका. न पेटलेले फटाके पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नका, अशी सूचना त्यांनी दिली. मोकळ्या जागेत, इमारती, वाहने व झुडपांपासून दूर फटाके फोडा. जमिनीवरील फटाक्यांसाठी किमान ३० फूट आणि आकाशात उडवायच्या फटाक्यांसाठी १०० यार्ड अंतर ठेवा. अल्कोहोलच्या प्रभावाखाली फटाके फोडणे टाळा. धुराचे फटाके वापरणे टाळल्यास पर्यावरण व श्वसनाच्या आजारांपासून संरक्षण मिळते अशी मार्गदर्शनपर सूचना डॉ. जानवळे यांनी केली. या घटनेने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. राजेशच्या उपचारासाठी नागरिकांनी सहानुभूती व्यक्त केली असून, अशा दुर्दैवी घटना टाळण्यासाठी फटाके फोडताना अत्यंत खबरदारी घ्यावी, असा इशारा वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे.

---------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २१ ऑक्टोबर २०२५

३

## जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या जिल्हा सचिवपदी नियुक्ती

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांचे विश्वासू तथा परळी वैजनाथ पंचायत समितीचे माजी उपसभापती व तालुक्यात मोठा जनसंपर्क असलेले माजी उपसभापती जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षाच्या बीड जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यानिवडीबद्दल नवनिर्वाचित जिल्हा सचिव जनिमियाँ कुरेशी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम वाढविण्यसाठी सदैव तत्पर राहणार असल्याची प्रतिक्रिया माजी उपसभापती जनिमियाँ कुरेशी यांनी दिली आहे.

# राजयोग फाऊंडेशन, रोटरी क्लब यांच्या वतीने हजारो कुटुंबीयांची दिवाळी झाली आनंदीत

### १५ संस्था व आश्रमांसहित अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांचाही यात समावेश

बीड । प्रतिनिधी

फराळाशिवाय दिवाळी हे समीकरणच जुळत नाही.काहीसा गोड, काहीसा तिखट पण चविष्ट असणारा दिवाळीतील महत्त्वपूर्ण ठेवा म्हणजे फराळ. राजयोग फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन च्या वतिने दिवाळी सणानिमित्त गोरगरिबांच्या घरात आनंदोत्सव साजरा व्हावा, गरजु कुटूंबांची दिवाळी आनंदाने साजरी व्हावी यासाठी राजयोग फाऊंडेशन व रोटरी मागील ९ वर्षांपासून निस्वार्थ भावनेतून हे समाजसेवेचे कार्य अविरत पार पाडत आहेत.






यानिमित्ताने हजारो निराधार गरजवंत कुटुंबांसह शहरातील दिव्यांगांना दिवाळी फराळ व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच जिल्ह्यातील सुमारे १५ वेगवेगळ्या वृद्धाश्रम, बालकाश्रम व निराधार केंद्रातील आश्रय दात्यांना देखील लाभ देण्यात आला.तसेच या वर्षी मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांना देखील फराळाचे वाटप केले. यामधे पसायदान प्रकल्प- ढेकणमोह, आपला परिवार-नेकनुर, लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे वृद्धाश्रम- घाटसावळी, शांतिवण- आर्वी, सेवाश्रम- ब्र.येळंब, आजोळ परिवार वृद्धाश्रम- राक्षसभुवन ता.शिरुर, कामधेनु वृद्धाश्रम- कोळवाडी, ईन्फंट आश्रम- पाली, आदीवासी समीकरण, सहारा बालग्राम - गेवराई, स्नेहसावली- रामनगर, निवारा बालगृह- सौताडा यांच्यासह बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र - बीड , रोटरी अन्नछत्र - दत्तमंदिर, विहान प्रकल्पातील दुर्धर आजारग्रस्त कुंटुंब आदिंचा समावेश होता.

त्याचबरोबर बीड शहरातील मोंढा रोड येथील अमरधाम व इतर स्मशानभूमींची देखभाल करणाऱ्या कुटुंब आणि तृतियपथी समुदायाला पण दिवाळी फराळ व इतर साहित्य देण्यात आले. या उपक्रमाप्रसंगी राजयोग फाऊंडेशन चे अध्यक्ष शुभम धुत, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष राहुल बोरा, सचिव प्रकाश कोंका, डॉ.सुरेंद्र बजाज, राजेश बंब, संतोष टवाणी, सुर्यकांत महाजन, संजय गुप्ता, जितेंद्र बोरा, विशाखा सूर्यवंशी, सर्वज्ञ जोशी, सुधीर येवले, नितीन भोसले, शुभम कातांगळे, ऋषभ वाघमारे, गिरीश मुंदडा, डॉ.वैभव कोठेकर, सागर वाहुळ, राजदीप धुत, मेघराज जगदाळे, संकेत करवा, वैभव जाधव, मुकुंद त्रिमुखे, अभिजित आव्हाड, ओंकार बोबडे व इतर उपस्थित होते.

## केंद्रीय कृषीमंत्री शेतकऱ्यांना संबोधित करणार

### ७ नोव्हेंबर रोजी भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन; अनेक मान्यवरांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सिरसाळा (ता. परळी) येथे ७ नोव्हेंबर २०२५ रोजी शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, माराठवाड्यातील शेतकरी बांधवांना केंद्रीय कृषीमंत्री संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याचेही संयोजकांच्या वतीने कळवण्यात आले आहे.



ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्याच्या पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

'कृषीकुल' हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून या वास्तूची उभारणी करण्यात आलेली असून, येथे मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांना आधुनिक शाश्वत शेतीचे परिपूर्ण प्रशिक्षण मोफत दिले जाते. जागतिक दर्जाच्या या प्रशिक्षण केंद्राला केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान भेट देणार आहेत. यानिमित्ताने शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून, हजारो शेतकरी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात केंद्रीय कृषीमंत्री उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करणार आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्याकडून शेतकऱ्यांच्या समस्या, शेती - मातीच्या गरजा, पुरपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना तसेच शेती विकासाच्या नव्या दिशा उपस्थित मान्यवरांसमोर ठेवण्यात येणार आहेत.

## स्वाराती संस्थेकरीता अभ्यागत मंडळ; अध्यक्षपदी खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आले आहे. या मंडळाच्या अध्यक्षपदी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा निर्णय राज्य शासनाच्या वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या वतीने काढला आहे.


स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय अंबाजोगाई या संस्थेत अंमलात असलेले नियम व आदेश यांच्या चौकटीमध्ये राहून रुग्णालयाच्या व्यवस्थापनांत सुधारणा करण्यासाठी मार्ग व साधने तयार करणे, निरनिराळ्या कामासाठी व विभागांसाठी मंजूर केलेल्या आर्थिक तरतूदींचा योग्य प्रकारे वापर होत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवणे. रुग्णालय संबंधिच्या जनतेच्या तक्रारीचा अभ्यास करणे व त्याचे निवारण होण्यासाठी करावयाच्या पध्दतीबद्दल शिफारस करणे, रुग्णालयातील कर्मचारी वर्गाची अनियमित उपस्थिती, अवक्तशीरपणा व गैरवर्तन इत्यादींबाबत आढावा घेणे व त्यांत सुधारणा व्हावी म्हणून शिफारस करणे. रुग्णालय परिसराची तपासणी करणे, सर्वसाधारण कामकाजांचा अभ्यास करणे व दोष आढळल्यास ते दूर करण्यासाठी उपाय सुचविणे. रूग्णालयासाठी जनतेकडून देणग्या नियंत्रित करणे, गोळा करणे व स्विकारणे व राज्य शासनास रुग्णालयांसाठी अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही अशा विशेष बाबींसाठी त्या उपयोगात आणणे, कोणती देणगी स्विकारण्यामध्ये अथवा तिचा रुग्णालयासाठी उपयोग करताना अंमलात असलेल्या नियमांचा व आदेशांचा भंग होता कामा नये. उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समितीच्या कामकाजामध्ये आवश्यक त्या पध्दती विहीत करणे व इतर आवश्यक त्या गोष्टी करणे. आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अमंलबजावणीचा आढावा घेणे आदि विषयांसाठी अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आलेले असून खा.बजरंग सोनवणे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## अतिवृष्टी व पुरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा : बीड तालुक्यासाठी १०२ कोटी ६३ लाखांचा मदतनिधी मंजूर

बीड । प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे . या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेतला असून राज्यातील पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्ह्यांसाठी तब्बल १३४६ कोटी ३० लाख रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला आहे . या निधीपैकी बीड तालुक्यासाठी १०२ कोटी ६३ लाख रुपये वितरित होणार आहेत .

शासन निर्णय १६ ऑक्टोबर २०२५ नुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे . अतिवृष्टी आणि पूरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना 'इनपुट सबसिडी' या स्वरूपात आर्थिक मदत दिली जाणार असून ही मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे.



बीड तालुक्यातील नुकसान व मदतवाटपाची तयारी - बीड तालुक्यात एकूण १,२०,८७२ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान नोंदवले गेले आहे . बीड, नेकनूर, पेंडगाव , पारगाव सिरस , मांजरसुंबा , येळंबघाट , चऱ्हाटा , नाळवंडी , म्हाळसजवळा , पाली, लिंबागणेश , चौसाळा , घाटसावळी , राजुरी नवगण , पिंपळनेर आणि कुर्ला या मंडळांतील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई वितरित केली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यात महसूल, कृषी आणि पंचायत विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली संगणकीकृत प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात येत आहे . तहसील कार्यालयांत विशेष नियंत्रण कक्ष उभारण्यात आले असून , प्रत्यक्ष पडताळणीनंतरच निधी वर्ग केला जात आहे.प्रशासनाची तयारी व बैठकींचा

### तहसीलदार व कर्मचारी रात्री जागून याद्या अपलोड करत आहेत

आढावा : बीड तहसीलदार यांच्या कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सायंकाळी स्वतः अनुदान वाटपाचा आढावा घेतला . उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुहास हजारे तसेच महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी , संगणक ऑपरेटर यावेळी उपस्थित होते . संगणक प्रणालीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची माहिती तपासून पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले . यावेळी जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की '' एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये आणि मदतवाटप पारदर्शक पद्धतीनेच व्हावे ''. मदत वितरणासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पार पडेल , तसेच बँक खात्यांमध्ये थेट निधी जमा होणार आहे.शासनाने दिलेल्या सूचनांनुसार लाभार्थ्यांची यादी तहसील व जिल्हाधिकारी यांच्या देखरेखीखाली तपासावी . कोणत्याही अपात्र व्यक्तीस मदत मिळणार नाही याची खात्री करावी . मदत देताना सर्व निकष व शासन निर्णयातील नियमांचे पालन आवश्यक आहे . निधीच्या वापरावर लेखा परीक्षण कार्यालय आणि महालेखापाल कार्यालयाची नजर राहणार आहे . शासन निर्णयानुसार , ही मदत आर्थिक वर्ष २०२५२६ मधील उपलब्ध निधीतून वितरित केली जाणार असून , सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत .

या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे . पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीची रक्कम जमा होणार असून , कृषी उत्पादन पुनर्संचयित करण्यासाठी ही मदत महत्त्वाची ठरणार आहे . राज्य शासनाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना वेळेवर मदत देण्यासाठी प्रशासन सज्ज राहावे , असे निर्देश महसूल विभागाचे सह सचिव संपत सूर्यवंशी यांनी दिले आहेत .

## घाटशिळ पारगाव गटामध्ये इच्छुकांची मोठी गर्दी

### भाजपच्या तिकिटासाठी होणार रस्सी खेच

शिरूर । प्रतिनिधी

**तालुक्यातील घाटशिळ पारगाव या जि.प.गटातून निवडणूक लढवण्यासाठी अनेकजन इच्छुक असल्याचे समोर येऊ लागले आहे. निवडणुकीचा कार्यक्रम अगदी काही महिन्यावर येऊन ठेपल्याने प्रत्येकजन आपला जनसंपर्क वाढवू लागला आहे. भाजपा मधून आपल्याला तिकीट मिळावे यासाठी अनेक प्रयत्नशील असल्याचे पाहायला मिळत आहे तर काहींनी अपक्ष निवडणूक लडवण्याची छुपी राजनिती चालवली आहे.**









बीड जिल्ह्यातील राजकारण आता स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीवरुन हळूहळू तापू लागले आहे. बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आष्टी -पाटोदा - शिरूर विधानसभा मतदारसंघाला नेहमीप्रमाणे याही वेळी मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दिवाळीनंतर या मतदारसंघांमध्ये मोठी उलथापालत होणार असल्याचे ही चर्चा कानी पडत आहे. असे असले तरी इच्छुकांनी आपापल्या पद्धतीने निवडणूक लढवण्याची जोरदार तयारी चालवली आहे. शिरूर कासार तालुक्यामध्ये घाटशिळ पारगाव या गटाला नेहमीप्रमाणेच राजकीय वर्तुळामध्ये महत्त्व प्राप्त होत आहे. या गटामधून निवडणूक लढवण्यासाठी किंबहुना आपल्या पत्नीला जिल्हा परिषदची कारभारीन करण्यासाठी इच्छुकांनी मोठ्या हालचाली चालवल्या आहेत. भाजपमधून निवडणूक लढवण्यासाठी सुरेश धस यांच्या खास समर्थक भाजपा नेत्या ॲड. चंपावती (काकी) पानसंबळ, घाटशिळ पारगावचे माजी सरपंच वैजिनाथ खेडकर, सावरगाव चकलाचे सरपंच शहादेव खेडकर माळेगावचे सरपंच गोकुळ दहिफळे, माजी जि.प. सदस्य रामराव खेडकर, माजी जि.प.सदस्य मोहनराव ढाकणे, राष्ट्रवादी(अजित पवार गटा)चे कार्यकर्ते ॲड.पांडुरंग जरांगे, तर सामाजिक कार्यकर्ते म्हणून बहुचर्चित असलेले पिंटूशेठ उर्फ महादेव खेडकर, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन (बप्पा) खेडकर, शिवसेना (उबाठा )गटाचे तालुकाध्यक्ष आजिनाथ खेडकर आदी लोकांनी जि.प. निवडणुकीसाठी जोरदार तयारी आहे. मतदारांच्या मतदारांची गाठीभेटी, जनसंपर्क वाढवणे यावरती भर देऊन आपली बाजू सिद्ध करण्यासाठी धडपडत आहेत. मात्र आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघांमध्ये दिवाळीनंतर मोठी राजकीय उलथा पालत होऊन राजकीय समीकरणे बदलण्याची संकेत दिसून येत असल्याने या गटामध्ये कोणत्या उमेदवाराला कोणत्या पक्षाकडून उमेदवारी मिळेल. कोण कोना बरोबर जाईल?कोण अपक्ष निवडणूक लढेल? सर्वांना खुर्चीची अभिलाषा निर्माण झाल्याने यासंबंधीचा अंदाज लावणे सद्यस्थितीमध्ये क्लिष्ट बाब झाली आहे. असे असले तरी भाजपामधून आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी मोठी रस्सीखेचही होणार असल्याचे बोलले जात आहे. तर माजी आ.भीमराव धोंडे गटातील नेते राजकीय हालचालीवर शांततापूर्ण लक्ष ठेवून येणाऱ्या काळाची प्रतीक्षा करत आहेत.

## मराठी पत्रकार परिषद अंबाजोगाई शाखेची नूतन कार्यकारणी जाहीर



### अध्यक्षपदी बालाजी खैरमोडे कार्याध्यक्ष पूनमचंद परदेशी उपाध्यक्ष सालेम पठाण तर सचिवपदी मारुती जोगदंड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशावरून तसेच बीड जिल्हाध्यक्ष विशाल सांळुके यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांच्या उपस्थितीत अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेच्या तालुकाध्यक्ष पदी बालाजी खैरमोडे यांची एकमताने निवड करण्यात आली.तर कार्याध्यक्ष पुनम परदेशी, उपाध्यक्ष सालेम पठाण, सचिव मारोती जोगदंड,तालुका संघटक ताहेर पटेल,कोषाध्यक्ष वैभव चौसाळकर,सह कोषाध्यक्ष फिरोज शेख,कार्यकारी सदस्य अभय जोशी, गोविंद जाधव यांची निवड करण्यात आली.

आज दुपारी ४ वाजता न.प.पत्रकार परिषद कक्षात संपन्न झालेल्या बैठकीत वरील नवनिर्वाचित कार्यकारिणीची निवड करण्यात आली.नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन मराठी पत्रकार परिषदेचे मार्गदर्शक विरेंद्र गुप्ता, एम.एम.कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.यावेळी डिजीटल मिडीयाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे,उपाध्यक्ष संजय जोगदंड कार्याध्यक्ष सतिश मोरे,अशोक कोळी,सुर्यकांत उदारे,स.का.पाटेकर,अहमद पठाण,अभय जोशी, गोविंद सुर्यवंशी,बालासाहेब ढगे,दत्ता खोगरे,अहमद शेख,अनिरुद्ध पांचाळ,विश्वनाथ कांबळे,योगेश डाके,उतरेश्वर शिंदे आदी पत्रकार उपस्थित होते.

cmyk

# सोयाबीन खरेदीत सरकारकडून दिरंगाई

बाजारात सध्या नवे सोयाबीन ३ हजार ५०० ते ४ हजारांनी विकले जात आहे. त्यामुळे सरकारने हमीभावाने खरेदी सुरू करणे आवश्यक आहे. बाजारात शेतकऱ्यांची लूट सुरू असताना दुसरीकडे सरकार मात्र खरेदी केंद्रांचा घोळ घालण्यात मग्न आहे. विदर्भ सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची खरेदीची बसलेली घडी विस्कटून नुकतेच महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचा नोडल एजन्सी म्हणून समावेश केला. तसेच कोणत्या संस्थांना कुणी खरेदी केंद्रे द्यायची याचे नियम बदलले. यामुळे खरेदी केंद्रे सुरू होण्यास उशीर लागत आहे.

यंदा सरकारने दिवाळीच्या आधी सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करण्याची मागणी शेतकरी करत होते. पण खरेदी नेमकी कधी सुरू होणार हे अद्यापही निश्चित नाही. सध्या बाजारात शेतकऱ्यांच्या नडीचा फायदा घेऊन कमी दरात खरेदी सुरू असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. सोयाबीनची काढणी केल्यानंतर ओलावा अधिक असतो. त्यामुळे केंद्राने ठरवून दिलेल्या एफएक्यूच्या अटीत हे सोयाबीन बसत नाही. १२ टक्क्यांपर्यंत ओलावा असलेले सोयाबीन खरेदी संस्था खरेदी करतात. मात्र सध्या बाजारात येणाऱ्या सोयाबीनमध्ये १८ ते २५ टक्क्यांच्या दरम्यान ओलावा येत आहे. त्यामुळे



खरेदीला उशीर होत असल्याचा बागुलबुवा सरकारी पातळीवरून केला जात आहे.


ओलावा कमी झाल्यानंतर बाजारातही १०० ते २०० रुपये अधिक मिळू शकतात, हे शेतकऱ्यांनाही ठाऊक आहे. पण बहुतांशी शेतकऱ्यांच्या हातात यंदा सोयाबीन हे खरिपातील पहिले पीक आले आहे. मूग आणि उडीद तसेच इतर काही पिकांचे मोठे नुकसान झाले. तर अनेक शेतकऱ्यांचे लवकर येणारे पीक म्हणजेच सोयाबीन असते. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान केले. दिवाळी सणासाठी शेतकऱ्यांना सोयाबीन विकणे भाग आहे. शेतकऱ्यांच्या या नडीचा फायदा घेतला जात आहे. देशातील उत्पादनात यंदा २० टक्क्यांपर्यंत घट

देशातील उत्पादनात यंदा २० टक्क्यांपर्यंत घट आल्याने बाजाराला पुढे नक्कीच आधार मिळेल. पुढील संधी साधण्यासाठी दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचा गैरफायदा घेतला जात असल्याचे दिसते. त्यासाठी ओलाव्याचे कारण दिले जात आहे. आपल्या सोयाबीनमध्ये नेमका ओलावा किती? हे शेतकऱ्यांना कळत नाही. खरेदीदार सांगतील त्यावर विश्वास ठेवल्याशिवाय पर्याय नाही, असे काही शेतकऱ्यांनी सांगितले. सध्या बाजारात ओलाव्यापेक्षा शेतकऱ्यांची नड लक्षात घेऊनच दर ठरत असल्याचा आरोप अनेक शेतकरी करत आहेत.

आल्याने बाजाराला पुढे नक्कीच आधार मिळेल. पुढील संधी साधण्यासाठी दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचा गैरफायदा घेतला जात असल्याचे दिसते. त्यासाठी ओलाव्याचे कारण दिले जात आहे. आपल्या सोयाबीनमध्ये नेमका ओलावा किती? हे शेतकऱ्यांना कळत नाही. खरेदीदार सांगतील त्यावर विश्वास ठेवल्याशिवाय पर्याय नाही, असे काही शेतकऱ्यांनी सांगितले. सध्या बाजारात ओलाव्यापेक्षा शेतकऱ्यांची नड लक्षात घेऊनच दर ठरत असल्याचा आरोप अनेक शेतकरी करत आहेत.

# पावसाचा जोर कमीच राहणार

## राज्यात ढगाळ हवामानासह पावसाची शक्यता



पुणे : राज्यातील काही भागात मागील ४ दिवसांपासून ढगाळ हवामानासह हलक्या सरी पडत आहेत. दुपारी उन्हाचा चटकाही जाणवत आहे. हवामान विभागाने पुढील ५ दिवस राज्यातील काही भागात ढगाळ हवामानासह तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज दिला आहे.

राज्यात काही ठिकाणी अंशतः ढगाळ हवामानाचा अंदाज आहे. तर नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशिव, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या सरींचा अंदाज देण्यात आला. उद्या काही भागात पावसाचा काहीसा जोर वाढण्याची शक्यता आहे. विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, गोंदीया, गडचिरोली तर मराठवाड्यातील परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातूर, धराशिव, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह पावसाचा अंदाज देण्यात आला. बुधवारी अकोला, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, नांदेड, सातारा, कोल्हापूर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह तुरळक पावसाचा अंदाज आहे. गुरुवारी विदर्भ, दक्षिण मराठवाडा तसेच सातारा, कोल्हापूर, सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात ढगाळ हवामनसह हलक्या सरींचा अंदाज देण्यात आला. शुक्रवारीही राज्यात काही ठिकाणी ढगाळ हवामनसह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# रताळ्याच्या या आहेत प्रसिद्ध जाती; होईल उत्पादनात वाढ

रताळे हे नैसर्गिकरित्या गोड मूळ पीक आहे. वर्षभर त्याची लागवड केली जाते. पण विशेषतः हिवाळ्यात त्याचे प्रमाण जास्त असते. बाजारात रताळ्याला नेहमीच मागणी असते. बटाट्यासारखे दिसणारे रताळे विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतले जातात. संपूर्ण जगाला भारतात पिकवल्या जाणाऱ्या रताळ्याची चव आवडते. रताळे पेरणीसाठी सप्टेंबर आणि ऑक्टोबरचा पहिला पंधरवडा उत्तम मानला जातो. चला भारतातील रताळ्याच्या पाच प्रसिद्ध जातींबद्दल जाणून घेऊया ज्यांच्या लागवडीमुळे चांगले उत्पादन मिळते आणि शेतकरी त्याची लागवड करून चांगला नफा देखील मिळवू शकतात. रताळ्याच्या पाच प्रसिद्ध जाती आहेत ज्यांच्या लागवडीमुळे चांगले उत्पादन मिळते आणि शेतकरी त्यांची लागवड करून चांगला नफा देखील मिळवू शकतात.



या जातींची लागवड करा : जर तुम्ही शेतकरी असाल आणि या सप्टेंबर महिन्यात कोणतेही पीक घ्यायचे असेल तर तुम्ही हे काम लवकर करू शकता. शेतकरी रताळ्याच्या काही सुधारित वाणांची लागवड करू शकतात. या सुधारित वाणांमध्ये श्रीभद्रा वाण, गौरी वाण, श्री कनका वाण, सिप्सवा २ वाण आणि -१४ वाणांचा समावेश आहे. या जातींची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.

श्रीभद्रा : ही रताळ्याची उच्च उत्पन्न देणारी जात आहे. ही जात ९० ते १०५ दिवसांत तयार होते. त्यात रुंद पाने असतात. हे कंद आकाराने लहान आणि गुलाबी असतात. या कंदामध्ये ३३ टक्के कोरडे पदार्थ, २० टक्के स्टार्च आणि २.९ टक्के साखर असते.

गौरी : रताळ्याच्या या जातीचा शोध १९९८ साली लागला. गौरी वाण तयार होण्यासाठी ११० ते १२० दिवस लागतात. रताळ्याच्या या जातीच्या कंदांचा रंग जांभळा आणि लाल असतो.

गौरी जातीच्या रताळ्याचे सरासरी उत्पादन हेक्टरी सुमारे २० टन आहे.

श्री कनका : रताळ्याची श्री कनका जात २००४ मध्ये विकसित करण्यात आली. या जातीच्या कंदाची साल दुधाळ रंगाची असते. तो कापल्यावर पिवळ्या रंगाचा लगदा दिसतो. ही जात १०० ते ११० दिवसांत पक्व होते. या जातीचे उत्पादन हेक्टरी २० ते २५ टन आहे. सीप्सवा २ : रताळ्याच्या या जातीचे उत्पादन आम्लयुक्त जमिनीत होते. त्यामध्ये कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. रताळ्याची ही जात ११० दिवसांत पिकते. त्याचे उत्पादन हेक्टरी २० ते २४ टन आहे.

एसटी -१४ : रताळ्याच्या या जातीचा शोध २०११ मध्ये लागला. रताळ्याच्या या जातीच्या कंदांचा रंग किंचित पिवळा असतो. लगद्याचा रंग हिरवा आणि पिवळा असतो. या जातीमध्ये व्हिटा कॅरोटीन (२० मिग्रॅ प्रति ३० ग्रॅम) जास्त प्रमाणात असते. ही जात तयार होण्यासाठी ११० दिवस लागतात. जर आपण त्याच्या उत्पादनाबद्दल बोललो तर ते सुमारे ७० टन प्रति हेक्टर आहे.

# जनावरांचा आवडता चारा लसूण घास

दुभत्या जनावरांना दिवसाकाठी २० ते २५ किलो हिरवा चारा आणि पाच किलो वाळलेला चारा लागतो. या लागणाऱ्या चार्याची नड भागवण्यासाठी शेतकरी हंगामी चारा पीक घेतो. एका हंगामात घेऊन पुन्हा दुसऱ्या हंगामात दुसरा चारा घेतल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक बोजा वाढतो. यावर उपाय म्हणजे बारमाही हिरवा चारा देणाऱ्या लसूण घासाची लागवड करणे. महाराष्ट्रात सध्या शेतीपूरक धंद्यांचा समावेश शेतकर्याने करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये दूध उत्पादन, शेळी-मेंढी पालन, मत्स्यपालन, मधुमक्षिका पालन इत्यादींचा समावेश आहे. दुग्धोत्पादनापासून मिळणारे उत्पादन शेतकऱ्याला बर्याच प्रमाणात सावरताना दिसत आहे. दुसरीकडे जनावरांचे आवडते खाद्य म्हणून लसून घास ओळखला जातो.

दुग्धोत्पादन हा व्यवसाय पूर्णत: चाऱ्यावर अवलंबून आहे. दुभत्या जनावरांना दिवसाकाठी २० ते २५ किलो हिरवा चारा आणि पाच किलो वाळलेला चारा लागतो. या लागणाऱ्या चाऱ्याची नड भागवण्यासाठी शेतकरी हंगामी ज्वारी, मका, बाजरी, ओट घेतो. एका हंगामात घेऊन पुन्हा दुसऱ्या हंगामात दुसरा चारा घेतल्याने शेतकऱ्यावर आर्थिक बोजा वाढतो.

यावर उपाय म्हणजे बारमाई हिरवा चारा देणाऱ्या लसूण घासाची लागवड करणे. लसूण घास हे बारमाई हिरवा चारा देणारे शेंगवर्गीय द्विदल पीक असून ते वातावरणातील नत्र स्थिर करते. पूर्ण एक वर्षाच्या काळात हे पीक जवळपास एक हजार किलो नत्र जमिनीत स्थिर करते. पूर्ण वापरताना ही



१५० किलो नत्र जमिनीत स्थिर करून पुढील वर्षी दुसऱ्या पिकास देणारे एकमेव पीक आहे. लसूण घासाच्या चाऱ्यात प्रथिने २० ते २४ टक्के, स्निग्ध पदार्थ २.३ टक्के, खनिजे १० टक्के, कर्बोदके ३६ टक्के, काष्टमय पदार्थ ३० टक्के, चुना १.२४ चार्यात अ आणि ड जीवनसत्त्व विपुल प्रमाणात आढळतात.जमीन : या पिकासाठी मध्यम ते भारी जमीन लागत असून चांगल्या निचऱ्याची आणि ७-८ सामू गरजेचे आहे. हे पीक खारवट जमिनीतही घेता येते.

या पिकासाठी जमीन तयार करताना प्रथम ती नांगरून घ्यावी. ढेकळे फोडून कुळवाच्या दोन ते तीन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर तण किंवा पूर्वीच्या पिकाचे अवशेष गोळा करून ते बांधावर जाळावेत. आता रिजरच्या साहाय्याने वरंब्याच्या वाफे तयार करून घ्यावे. वाफे बांधणी प्रति हेक्टरी ४० गाड्या शेणखत टाकावे. तसेच पेरणीपूर्वी ४० किलो नत्र, १५० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश द्यावा. दर चार महिन्यांनी प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, डीएपीची मात्रा दिल्यावर उत्पादनात भर पडते.

पेरणी आणि जिवाणू खंताचा वापर :

लसूण घासाची पेरणी ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात केल्यावर अधिक फायदा होतो. प्रति हेक्टरी ३० किलो बियाणे ३० सेमी अंतराने पेरावे. जिवाणू खते २५० ग्रॅम प्रति दहा किलो बियाण्यास लावून घ्यावीत, यामुळे उत्पादनात वाढ होण्यास मदत होते.जनावरांचा आवडता चारा लसूण घाससुधारित वाण : आनंद -२, आरएल ८८

तण आणि पाणी व्यवस्थापन : सुरुवातीच्या आणि नंतरच्या काळात तण जास्त येण्याची शक्यता असते. कारण हे पीक बहुवार्षिक असून जास्त काळ शेतावर असते. तणाचे प्रमाण जास्त होऊ नये म्हणून दर दोन महिन्यानंतर पिकांच्या दोन ओळीतील रान कुदळीने खोदून जागा मोकळी करावी. आलेले तण वेचून ते बाहेर फेकून द्यावे. या पिकासाठी पाणी हंगामानुसार द्यावे. खरिपात पावसाचे अंतर पाहून पाणी द्यावे तर उन्हाळ्यात पाच ते सहा दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

पीक संरक्षण : लसूणघास या पिकावर सर्वसाधाण पणे माव्याचा प्रादुर्भाव दिसतो. या किडीचा बंदोबस्त करण्यासाठी तीन टक्के निंबोळी ऊर्फ पाण्यात मिसळून फवारावे. दुसरी फवारणी आठ दिवसांच्या अंतराने करावी.

कापणी आणि उत्पादन : पहिली कापणी लागवडीनंतर ५५ ते ६० दिवसांनी करावी. नंतरच्या कापण्या २५ ते ३० दिवसांच्या अंतराने कराव्यात. वर्षभरात १० ते ११ कापण्यांमध्ये जवळपास १०० क्विंटल प्रति हेक्टरी हिरवा चारा मिळतो.




## महत्वाच्या घटना

१२९६ : अल्लाउद्दिन खिलजी हे दिल्ली येथील शासक बनले.
१८५४ : फ्लोरेन्स नायटिंगेल आणि इतर ३८ नर्सेसना क्रिमीयन युद्धात वैद्यकीय सेवेसाठी पाठवण्यात आले.
१८७९ : थॉमस एडीस यांनी दिव्यांच्या प्रकाशाच्या डिझाइनसाठी पेटंट दाखल केले.
१८८८ : स्वीस सोशल डेमोक्रेटिक पार्टी सुरु झाली.
१९३४ : जयप्रकाश नारायण यांनी 'काँग्रेस सोशालिस्ट पार्टी'ची स्थापना केली.
१९४३ : सिंगापूर येथे आझाद हिन्द सेनेची स्थापना
१९४५ : फ्रान्समधे स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.
१९५१ : डॉ. शामाप्रसाद मुकर्जी यांनी दिल्ली येथे 'भारतीय जनसंघ' या पक्षाची स्थापना केली.
१९८३ : प्रकाशाने निर्वातात १/२९९७९२४५८ सेकंदात कापलेले अंतर अशी १ मीटरची व्याख्या ठरवली गेली.
१९८७ : भारतीय शांतिसेनेने जाफनातील एका रुग्णालयावर केलेल्या हल्ल्यात ७० तामिळ ठार झाले. यात रुग्ण, डॉक्टर व नर्सेसचा समावेश होता.
१९८९ : जनरल अरुणकुमार वैद्य यांचे मारेकरी सुखदेवसिंग आणि हरविंदरसिंग यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.
१९९२ : अकराव्या ताश्कंद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अभिनेत्री अपर्णा सेन यांना 'महापृथ्वी' या बंगाली चित्रपटातील भूमिकेबद्दल सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.
१९९९ : चित्रपट निर्माते बी. आर. चोप्रा यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
२००२ : मुंबई पोलिसांनी सलमान खान विरुद्ध वांद्रे दंडाधिकारी कोर्टात आरोपपत्र दाखल केले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतील आपत्ती प्रतिसाद कार्यात सहभागी पोलिस आणि निमलष्करी दलाच्या जवानांचा सन्मान करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नावाने पुरस्कार जाहीर केला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३० : हिमालय भागाचा शोध लावणारे पहिले भारतीय व्यक्ती नैन सिंह रावत यांचा जन्मदिन.
१८३३ : अल्फ्रेड नोबेल स्वीडीश संशोधक आणि नोबेल पुरस्कारांचे प्रणेते (मृत्यू: १० डिसेंबर १८९६)
१८८७ : भारतीय वकील आणि राजकारणी कृष्णा सिंह यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जानेवारी १९६१)
१९१७ : राम फाटक गायक व संगीतकार (मृत्यू: २६ सप्टेंबर २००२)
१९२० : धर्मभास्कर गं. ना. कोपरकर वैदिक धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान यांचा विज्ञानाधारित अभ्यास करुन त्या संदर्भाचे लेखन, प्रकाशन, प्रचार व संशोधन त्यांनी केले. चार वेद, सहा शास्त्रे, मनुस्मृती, याज्ञवल्कस्मृती व इतर अनेक असे धर्म या विषयावर १९७ ग्रंथ त्यांनी लिहीले. त्यांना द्वारकापीठाच्या शंकराचार्यांकडून 'धर्मभास्कर' तर करवीरपीठाच्या शंकराचार्यांकडून 'धर्मऋषी' या पदव्या मिळाल्या होत्या.
१९३१ : शम्मी कपूर हिन्दी चित्रपट अभिनेता व निर्माता (मृत्यू: १४ ऑगस्ट २०११)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री आणि नर्तक हेलन यांचा जन्मदिन.
१९४० : एडसन अरांतेस डो नासिमेंटो उर्फ पेले ब्राझीलचा फुटबॉलपटू
१९४९ : बेंजामिन नेत्यान्याहू इस्त्रायलचे वे९ पंतप्रधान

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४२२ : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १६ सप्टेंबर १३८०)
१८३५ : मुथुस्वामी दीक्षीतार तामिळ कवी व संगीतकार (जन्म: २४ मार्च १७७५)
१९८१ : दत्तात्रय रामचंद्र बेन्द्रे ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कन्नड कवी (जन्म: ३१ जानेवारी १८९६ धारवाड, कर्नाटक)
१९९० : भारतीय तत्त्ववेत्ता आणि लेखक प्रभात रंजन सरकार यांचे निधन. (जन्म: २१ मे १९२१)
१९९५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (जन्म: ९ एप्रिल १९२५)
२०१० : भारतीय कवी आणि अनुवादक अ. अय्यप्पन यांचे निधन. (जन्म: २७ ऑक्टोबर १९४९)
२०१२ : यश चोप्रा चित्रपट दिग्दर्शक, पटकथालेखक आणि निर्माते (जन्म: २७ सप्टेंबर १९३२)

# किटकनाशकांच्या विविध प्रकारांची ओळख

किटकनाशके पिकांना हानिकारक किटकांपासून संरक्षण देण्यासाठी वापरली जातात. किटकनाशके त्यांच्या कार्यप्रणाली, रसायनिक घटक, आणि वापराच्या प्रकारानुसार विविध प्रकारात विभागली जातात. खाली किटकनाशकांचे प्रमुख प्रकार आणि त्यांची माहिती दिली आहे. संपर्क किटकनाशक : हे किटकनाशक किटकाच्या शरीराच्या संपर्कात आल्यावर त्यांना मारते. किटक यांचा थेट संपर्क झाल्याशिवाय प्रभावी होत नाही. उदाहरणे: पायरेथ्रॉइड्स, कार्बेरिल. आंतरप्रवाही किटकनाशक :हे किटकनाशक पिकांच्या मुळांतून शोषले जाते आणि सर्व वनस्पतीमध्ये पसरते. किटक पिके खाताना हे किटकनाशक त्यांच्या शरीरात जाते आणि त्यांना मारते. उदाहरणे: इमिडाक्लोप्रिड, अॅसिफेट. पोटातक्रियाजन्य किटकनाशक : हे किटकनाशक किटकांच्या पोटात गेले की प्रभावी ठरते. पिके खाल्यानंतर किटकांचे पचन संस्थान प्रभावित होते आणि त्यामुळे ते मरतात. उदाहरणे: कार्बामेट्स, ऑर्गनोफॉस्फेट्स. श्वसनमार्गे किटकनाशक : हे किटकनाशक वायू स्वरूपात वापरले जाते आणि किटकांच्या श्वसनमार्गातून शरीरात प्रवेश करून त्यांना मारते. उदाहरणे: मिथाइल ब्रोमाईड, फॉस्फीन. प्राकृतिक किटकनाशके : या किटकनाशकांमध्ये प्राकृतिक घटक असतात जे जैविक पद्धतीने किटकांचा नाश करतात. हे पर्यावरणपूरक आणि मानवी आरोग्यास सुरक्षित मानले जातात. उदाहरणे: नीम तेल, बॅसिलस थुरिंजिएन्सिस. विकर्षक किटकनाशक : या किटकनाशकांचा उपयोग किटकांना पिकांपासून दूर ठेवण्यासाठी केला जातो. हे किटकांना आकर्षित न करता त्यांना दूर ठेवतात. उदाहरणे: डीईईटी, सायट्रोनेला तेल. विकसनरोधक किटकनाशक : हे किटकनाशक किटकांच्या विकास प्रक्रियेवर प्रभाव टाकते. किटकांची वाढ, त्यांचे जीवनचक्र किंवा त्यांचे प्रजनन यावर नियंत्रण ठेवते.



# राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत



# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका अजित दादा गट पूर्ण ताकतीने लढवणार -अरविंदराव चव्हाण

परतुर। प्रतिनिधी

वाटुर येथे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने परतूर मंठा नेर शेवली मतदार संघात आढावा बैठक संपन्न.

परतुर मतदार संघात माजी आमदार सुरेश जेथलिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आल्याने पक्ष मजबूत झालेला आहे. आपला पक्ष हा स्वबळावर देखील या मतदारसंघात निवडणूक लढवण्यास सक्षम असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळेस केले. दादांना भविष्यात मुख्यमंत्री करण्यासाठी, त्यांचे हात मजबूत करण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी उपस्थित असलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. माजी आमदार सुरेश जेथलिया यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, सत्ता असो वा नसो कार्यकर्ते कधीही मला सोडून गेले नाहीत. या निवडणुका कार्यकर्त्यांच्या असल्याने त्यांच्यासाठी पूर्ण ताकतीने रिंगणात उतरणार असून जास्तीत जास्त जि.प.सदस्य व पं. स. सदस्य निवडून आणणार. व तसेच परतूर नगरपालिकेत देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवणार असा आत्मविश्वास त्यांनी पक्षश्रेष्ठींना दिले.



पक्षाचे उपाध्यक्ष मधुकर राजे आर्दड यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की अजित दादा हे अतिशय शिस्तप्रिय नेते असून सर्व स्तरातील जनतेचा विश्वास अजितदादा यांच्या नेतृत्वावर आहे. या कारणास्तव मी देखील निवृत्त झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडला व अनेक निवृत्त सनदी अधिकारी पक्षात येणार आहेत असेही यावेळी त्यांनी सांगितले.जनतेने तुम्हाला निवडणूक लढवण्यासाठी आग्रह केला पाहिजे. अशी प्रतिमा सामान्य जनतेत बनवा असा कानमंत्र इच्छुक उमेदवारांना दिला. तसेच मा.आ.शिवाजीराव चोथे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की जालना जिल्ह्यामध्ये आपला पक्ष कसा बळकट करता येईल याकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. संघटन मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे.मी ज्या पक्षात होतो तिथे देखील पक्ष संघटनेचे काम केले, इथे देखील त्याचप्रकारे काम करणार असून आपल्यावर कोणताही अन्याय झाला तर मी तुमच्यासोबत उभा राहील हा शब्द दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अण्णासाहेब खंदारे यांनी केले, तर कार्यकर्त्यांच्या वतीने नितीन जेथलिया यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित चंद्रकांत कारके,रवींद्रतात्या तौर, बळीरामजी कडपे,लक्ष्मणराव दळवी,जयमंगल जाधव,माऊली सरकटे,शेख मेहमूद,रजाक भाई,खय्युम भाई पठाण, महिला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील,संतोष ढेंगळे,सतीश वाव्हळ,सविता कांबळे, शंकूतला कदम, यांच्यासह सर्व माजी ज.प./ पं.स. सदस्य व माजी नगरसेवक, सर्व प्रमुख पदाधिकारी,कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार उपस्थित होते.

## उमरगा तालुक्यातील भूकंपग्रस्तांच्या समस्यांवर खा. पवार यांच्याशी चर्चा

धाराशीव

उमरगा, लोहारा तालुक्यातील भूकंपाने बेचिराख झालेल्या गावांचा नव्याने पुनर्वसन विकास आराखडा तयार करून माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्यासमोर आमदार प्रवीण स्वामीं यांनी मुंबईत सादर करून याबाबत सविस्तर चर्चा केली.

सन १९९३ साली झालेल्या महा प्रलयंकारी किल्लारी सास्तुरच्या भूकंपाने जगाचे लक्ष वेधून घेतले. गणेश विसर्जन मिरवणूक संपवून विसावलेल्या गणेश भक्तांना धरणी कंपानी क्षणार्धात जीवनयात्रा संपवावी लागली. त्याला ३२ वर्षे पूर्ण झाली, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी युद्धपातळीवर कामे करून लोकांना तात्काळ मदतीसाठी सर्व शक्ती पणाला लावली. दररोज किल्लारी, सास्तुर परिसरात स्वतः भेटी देऊन मदत कार्य राबविले. त्याला जवळपास ३० वर्षे ओलांडून गेली, त्यानंतर या भूकंपग्रस्तांना पुन्हा कोणतीही मदत झाली नाही. या भागातील कुटूंब व लोकसंख्या वाढली, तत्कालीन घरे अपूरे पडत आहेत. अनेक घरांना तडे गेले आहेत. रस्ते उखडले आहेत. गावचे पूनर्वसन झाले असले तरी पुन्हा या गावात समस्या आ वासून उभ्या आहेत. आमदार स्वामी यांनी उमरगा लोहारा तालुक्यातील ३७ गावाचा नव्याने पूनर्वसन आराखडा तयार केला आहे. या कामी मदत करून शेतकरी आणि जनतेला मदत करण्याचे आश्वासन शरद पवार यांनी दिले असल्याचे स्वामी यांनी सांगितले. यावेळी माजी मंत्री आमदार जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमरगा तालुका अध्यक्ष संजय पवार, इस्माईल शेख आदींची उपस्थिती होती. शरद पवार यांनी भूकंपातील अनेक आठवणींना उजाळा दिला. या भागातील अतिवृष्टीने शेतकऱ्यांची स्थिती जमिनी खरडून गेल्याने शेतीचे झालेले नुकसान, पशुधनाची हानी आणि परिसरातील प्रत्येक नागरिकांची गावनिहाय आस्थेवाईक चौकशी केली. पवार यांनी प्रत्येक गावाच्या समस्या जाणून घेत अनेक आठवणींना उजाळा दिला असल्याचे आमदार स्वामी यांनी सांगितले. उमरगा लोहारा तालुक्यासाठी तयार करण्यात आलेला ३७ गावांचा पुनर्सन विकास आराखडा पाहून त्यानीं समाधान व्यक्त केले.

## स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेऊन विकास साध्य करु- आ.संदीप क्षीरसागर

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार लिंबागणेश पंचायत समिती गणाची बैठक



बीड प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात असताना भरीव मदतीची अपेक्षा होती. परंतु सरकारने तुटपुंजी मदत देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसले. जाहीर केलेली नुकसान भरपाई अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर पडली नाही. जी काय मदत आहे ती प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोच करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. राजकीय भूमिकेमुळे फायदा ही होतो.आणि तोटाही होतो. विकास निधीसाठी संघर्ष करावा लागतोय. ही वेळ ही जाणार आहे.नियती कोणाला माफ करत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्ष ताकतीनिशी उतरणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद निवडणुकीत १००% संपादन करून स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेऊन लोकसंख्या निहाय आपल्या हक्काचा विकास निधी खेचून आणू. कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन आमदार संदीप भैया क्षीरसागर यांनी श्रीक्षेत्र बेलेश्वर येथे आयोजित लिंबागणेश पंचायत समिती गणातील कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले आहे.

आज श्रीक्षेत्र बेलेश्वर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने लिंबागणेश पंचायत समिती गणाची बैठक आणि दीपावली स्नेहमिलन व फराळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास महंत महादेव महाराज, हभप तुकाराम महाराज, आमदार संदीप भैया क्षिरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गणेश ढवळे यांची प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाल. या बैठकीस आ.संदीपभैया क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी परिसरातील विकास कामाबाबत मार्गदर्शन केले. लिंबागणेश पंचायत समिती गण सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित असून उमेदवारांची चाचणी करण्यात आली. या बैठकीसाठी लिंबागणेश पंचायत समिती गणातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच, चेअरमन यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते

# प्रियदर्शनी कॉलनीत सिमेंट रोडचे भूमिपूजन

## प्रभागाचा विकास जनतेच्या विश्वासातून -भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

जालना संभाजीनगर परिसरातील प्रियदर्शनी कॉलनीतील नागरिकांची दीर्घकाळची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. विजू भदणेकर यांच्या घरापासून ते शांतीलाल हरदेकर यांच्या घरापर्यंतच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भारतीय जनता पार्टीचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास नगरसेवक जिवन सले, भाजपा सरचिटणीस सुनिल पवार, चिटणीस सुभाष (मामा) सले, कल्याण भदणेकर, रोहित नलावडे, आकाश नखनव, गोविंद पवार, गणेश मालोदे, डॉ. भोंडवणे सर, महेश भोसले, आकाश नखनव यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भास्कर (आबा) दानवे म्हणाले भाजप सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रत्येक प्रभागाचा सर्वांगीण विकास हा आमचा ध्यास असून, हा रस्ता काम जनतेच्या विश्वासातून साकार होत आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक सुलभ होईल, पावसाळ्यातील चिखल व अडथळ्यांपासून नागरिकांना दिलासा मिळेल.



## बंदी असूनही सर्रासपणे शहरात येणाऱ्या जड वाहनांमुळे कोंडी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरात वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर उपाय म्हणून अवजड वाहनांना दिवसा प्रवेश बंदी करण्यात आली आहे. परंतु तरीही वर्दळीच्या ठिकाणी मोठी वाहने येत असल्याने आणखी जास्त वाहतूक कोंडी होत आहे. शहरातील अनेक भागात अशीच स्थिती असून कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. दिवाळीचा सण असल्याने बाजारात गर्दी वाढली आहे. दिल्ली गेट, नील क्रांती चौक, नेप्ती नाका, अप्पू हत्ती चौक या भागात अवजड वाहने दाखल होत आहेत. सकाळी कार्यालयीन वेळ आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी अशी वाहने येत असल्याने दुचाकी व कारही या कोंडीत अडकून पडतात. त्यातच राँग साईड येणाऱ्या वाहनांमुळे जास्त डोकेदुखी वाढते.

एकदा का वाहतूक कोंडीत वाहने अडकली की अर्धा ते एक तास ही कोंडी फुटत नाही. पादचाऱ्यांनाही या मार्गावरून जाणे कठीण होते. शहरातील ठराविक ठिकाणांवरून कारवाईसाठी वाहतूक पोलिस असतात, पण वर्दळीच्या भागातही पोलिसांची ड्युटी लावण्यात यावी, अशी मागणी वाहनचालकंकडून होत आहे. दिल्ली गेट परिसरात तर दिवसातून अनेक वेळा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. अप्पू हत्ती चौकातून पुढे दिल्ली गेटकडे जाण्याच्या मार्गावर काही शाळा आहेत. त्या सुटण्याच्या वेळेला स्कूलबसही या कोंडीत सापडून पडतात. विना नंबरची अवजड वाहने शहरात आधीच अवजड वाहनांना बंदी असताना ती वाहने शहरात दाखल तर होतातच, त्यातही काही वाहनांना नंबर प्लेटही नसते. अशा पद्धतीने दुहेरी नियमांचा भंग वाहनचालकांकडून केला जातो. अशी वाहने शहरात येतातच कशी? त्यांच्यावर कारवाई का होत नाही? असा प्रश्न शहर वासीयांकडून विचारला जात आहे.

## मतदार याद्यांमध्ये घोळ! शिंदे गटाच्या नेत्यावर भाजपचा आरोप

संभाजीनगर

राज्यात सत्ताधारी महायुतीमध्येच मतदार यादीतील कथित गैरप्रकारांवरून मोठा संघर्ष उभा राहिला आहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे सिल्लोड नगरपरिषद निवडणुकीच्या मतदार यादीतील गैरव्यवहाराच्या विरोधात भाजपच्या नेत्यांनी थेट शिंदे गटाचे आमदार आणि मंत्री अब्दुल सत्तार यांच्याविरोधात उपोषण सुरू केले आहे.

अब्दुल सत्तार यांच्या दबावामुळे सिल्लोड नगरपरिषद निवडणुकीच्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार आणि हेराफेरी होत असल्याचा भाजपचा मुख्य आरोप आहे. नगरपरिषद निवडणुकीसाठी तयार केलेल्या यादीत बोगस नावे इकडून तिकडे हलवण्यात आली आहेत. प्रभाग क्रमांक ४ मध्ये जे लोक राहात नाहीत, अशा सुमारे हजार लोकांची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रभाग क्रमांक ८ मध्ये जिथे प्रत्यक्षात केवळ चारच घरे आहेत, तिथे ९५० नावे दाखवण्यात आली आहेत. शिक्षक कॉलनीमध्ये राहणाऱ्या लोकांची २०० ते २५० नावे बाहेरच्या भागात दाखवण्यात आली आहेत. भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी थेट आरोप केला आहे की, आमदार अब्दुल सत्तार हे मागील निवडणुकीत मयत झालेल्या लोकांच्या मतदानावर निवडून आले आहेत. "जे मयत झालेले लोक होते, त्यांच्या नावावर त्यांनी मतदान केलेले (करून घेतलेले). त्याच्यावरती मरेल माणसावर निवडून आलेला आमदार असेल तर तो आमदार अब्दुल सत्तारे," असे भाजप नेत्यांनी म्हटले आहे. मतदार यादीत समाविष्ट केलेली सर्व बोगस नावे तात्काळ वगळण्यात यावीत. सिल्लोड नगरपरिषदेत अब्दुल सत्तार यांचा गेल्या २०-२५ वर्षांपासून दबाव आहे. त्यामुळे येथे आयएएस दर्जाचा अधिकारी नेमण्यात यावा. या आयएएस अधिकाऱ्याच्या उपस्थितीमध्ये सर्व निवडणूक प्रक्रिया पार पाडली जावी. भाजप नेत्यांनी सत्तार हे मित्रपक्षाचे असले तरी मतदार यादीतील हेराफेरी खपवून घेणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. या उपोषणाने महायुतीमधील अंतर्गत तणाव चव्हाट्यावर आला आहे.

# बुद्ध आणि त्यांचा धम्म''ग्रंथाचे वाचन अंतर्मनातून करून तसे आचरण करणे गरजेचे-भिक्खू धम्मशील थेरो

## नागसेन बुद्ध विहार येथे वर्षावास धम्म ग्रंथ वाचन समापन कार्यक्रम उत्साहात

बीड । प्रतिनिधी

२५०० वर्षापूर्वी तथागतांनी श्रावस्ती, राजगृह, वैशाली, नालंदा अशा विविध ठिकाणी आपल्या देशनेतून मानव कल्याणाकरिता प्रज्ञा,शील,अष्टांगिक मार्ग व मैत्री, करुणा, दान पारमिता बद्दल बहुमोल उपदेश केला. तीच परंपरा भिक्खू संघाने पुढे चालू ठेवून वर्षावासातील ३ महिने तथागतांचा उपदेश परिसरातील उपासक,उपासिकांना विहारात राहून समजावून सांगत असत. अभ्यासाअंती खूप मेहनत घेऊन डॉ. बाबासाहेबांनी तथागतांचा बहुमोल उपदेश ''बुद्ध आणि त्याचा धम्मग्रंथ'' या ग्रंथाद्वारे सर्वसामान्यांना समजावा म्हणून लिखित स्वरूपात जो की त्यांचा शेवटचा लिहिलेला ग्रंथ आहे.

वर्षावासातील या ग्रंथाचे वाचन हे केवळ वाचन न करता ते वाचन अंतर्मनातून करून तसे आचरण करणे कसे मानव कल्याणाचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे धम्मग्रंथ वाचन समापन प्रसंगी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या मधुर वाणीतून उपस्थित उपासक उपासिका यांना



बालक बालिकानां धम्मदेशने द्वारे सांगितले. सर्वप्रथम भिकखू धम्मशील थेरो भिकखु धम्मबोधी शिवनी यांची कृषी कॉलनी ते नागसेन बुद्ध विहार सवाद्य रॅली काढण्यात आली. विहारात आगमन झाल्यानंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण पूज्य भन्ते धम्मशील थेरो यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम आदर्शाची पूजन भन्तेच्या हस्ते करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विहार कमिटीतर्फे महिला उपोसकांनी पूज्य भंतेचे पुष्पगुच्छ देऊन त्रिवार वंदन करून स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक बौद्धाचार्य ज्ञानोबा पोटभरे यांनी केले तर सूत्रसंचालन से. नी वरिष्ठ शाखा प्रबंधक एल.आय. सी बीड आयु. यु एस वाघमारे यांनी केले. याप्रसंगी श्री परमेश्वर बनकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचाराने चालण्याचे महत्त्व विशद केले. आपल्या देशनेत पूज्ज भन्ते म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुमोल उपदेशांचा सखोल विचार करून विचारपूर्वक प्रत्येक रविवारी बौध्दानी सहकुटुंब विहारात यावे आणि मनाला सुख ,शांती , समाधान देणाऱ्या धम्माचे तत्व आगींकारुण आपले जीवन समृद्ध करावे आणि बुध्द धम्माचा प्रचार व प्रसार करणारी चळवळ आधिक गतीमान करण्यासाठी आपले योगदान द्यावे.केशरताई त्रिंबकराव कांबळे यानी उपस्थिता प्रती आभार व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील व शहरातील बहुसंख्य उपासक,उपासिका बालक-बालिकांची उपस्थिती होती शेवटी सरणत्तयने व भोजन दानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अनिल काळुशे यांची कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड

मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेची बैठक



पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या बीड विभागीय अध्यक्षपदी अनिल काळुशे यांची निवड झाली. ही निवड सर्वानुमते करण्यात आली. कार्यक्रमात संघटनेचे लातूर परिमंडळ अध्यक्ष आर. एस. गायकवाड, बीड सर्कल सचिव शेख मुज्जमील, विभागीय अध्यक्ष विक्की वाघमारे, विभागीय सचिव देवगुडे, ज्येष्ठ मार्गदर्शक अविनाश सोनकांबळे आणि प्रदीप वाघमोडे उपस्थित होते. संघटनेचे इतर सदस्यही मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमात अनिल काळुशे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी संघटनेच्या पुढील कार्ययोजना, विद्युत कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आणि हक्कासाठीच्या लढ्याची रणनीती यावर चर्चा झाली. निवडीनंतर अनिल काळुशे यांनी सांगितले, "सर्व पदाधिकारी आणि सदस्यांच्या विश्वासाला पात्र ठरून मागासवर्गीय विद्युत कर्मचाऱ्यांच्या न्यायहक्कासाठी मी नेहमी अग्रभागी राहीन. संघटनेचे हित हेच माझे ध्येय असेल. सभेच्या शेवटी उपस्थितांनी नवीन अध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या बळकटीकरणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# खात्यात पैसे न आल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात?

## नुसत्याच याद्या, त्यातही कपात, केवायसीच्या नावाखाली अनेकांची अडवणूक, फार्मर आयडी नेमका कशासाठी?

बीड । प्रतिनिधी

ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांची दिवाळी गोड करू म्हणणाऱ्या सरकारला सणसणीत चपराक असून सोमवारी दिवसभर शेतकऱ्यांना पैसे मिळाले नसल्याने शेतकऱ्यांची निराशाच झाली. शेतकऱ्याची दिवाळी अंधारात जाते की काय अशी भीती वाटू लागली असून केवळ याद्या टाकल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. त्यातही साडेआठ हजार देऊ म्हणणारे सरकार चार-पाच हजार रुपयांवर बोळवण करू लागले आहे. पैसे देतांनाही अनेक अडचणी निर्माण होत असून फार्मर आयडी काढलेला असतानाही केवायसी ची मागणी करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

मागील सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात बीड जिल्ह्यामध्ये तुफान पाऊस झाला. या पावसाने होत्याचे नव्हते झाले. अनेकांच्या पिकांची नासाडी झाली तर नदीकाठच्या शेतामध्ये जमीन खरडून गेल्याने शेतीच राहिली नाही. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांना मदत देऊ असे म्हणून शेतकऱ्यांची समजूत काढली. प्रशासनालाही कामाला लावले. मात्र दिवाळी गोड करणारे सरकार आता नेमके कशी दिवाळी गोड करणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. दिवाळीच्या पहिल्या दिवशी शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे न पडल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. शेतकरी पैसे पडण्याची वाट पाहत होते. त्यावर त्यांची दिवाळी अवलंबून होती मात्र तसे झाले नाही.



दिवसभर या अनुदानाची चर्चा चालू होती. आज दिवसभरात पैसे पडतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र त्यांची निराशा झाली त्यातही अनेक गावच्या याद्या आल्या त्यात हेक्टरी साडेआठ हजार रुपये देणारे सरकार कपात करून पाच-सहा हजारावर बोळवण करत आहे. त्यातही केवायसी ची अडचण निर्माण झाली आहे. ज्यांचा फार्मर आयडी आहे त्यांना केवायसी ची गरज नाही असे जिल्हाधिकारी ओरडून सांगतात. मात्र प्रत्यक्षात त्रुटी निघाल्यानंतर केवायसी करा असे सांगितले जात आहे. प्रशासन नेमके काय करते आहे. शेतकऱ्यांना अडचणीत आणण्याचा हा डाव आहे की काय अशी शंका शेतकऱ्यांना येत आहे. बँकांनी कर्जासाठी अनेकांचे खाते होल्ड करून ठेवलेले आहेत. परवाच जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे अनुदान कर्ज खाते जमा करू नये किंवा त्यांचे खाते होल्ड करू नये असे बँकांना सुचित केले होते. मात्र त्याचा बँकावर परिणाम झालेला दिसत नाही. आजही बँकेचे होल्ड निघालेले नाही. अनेक शेतकरी बँकेकडे चकरा मारतात. अनेकांचे मागचे अनुदान अजून बँकेत पडलेले आहे. मात्र हे पैसे बँका जाणीवपूर्वक देत नाहीत. असे चित्र सध्या तरी दिसत आहे. जर पैसे मिळाले तरच शेतकऱ्यांची दिवाळी होईल नसता शेतकऱ्यांना शिमगा करायची वेळ येईल आणि सरकारच्या विरोधात मोठा असंतोष निर्माण होईल अशी शक्यता सध्या तरी दिसत आहे. प्रशासनाने आज दिवसभरात जर पैसे दिले तर शेतकऱ्यांमधील असंतोष कमी होईल नसता दिवाळीच्या तोंडावर दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने शेतकऱ्यांमध्ये सरकारच्या विरोधात मोठा असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे.

# बालस्वरांनी उजळली बालरंगभुमीची दिवाळी पहाट

बीड । प्रतिनिधी

बालरंगभुमी परीषद शाखा बीडच्या वतीने शहरातील बालकलावंतासाठी आयोजित केलेली सुरमयी दिवाळी पहाट अत्यंत उत्साहात संपन्न झाली. बालरंगभुमी परिषद मुख्य शाखा मुंबईच्या उपाध्यक्षा तथा बालरंगभुमी परिषद शाखा बीडच्या अध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी एक अभिनव उपक्रम राबवला. दिवाळी पहाट ही बालकलावंताची असावी या कल्पनेतून आज धनत्रयोदशीच्या दिवशी बीड मधील ५० ते ७५ कलावंतानी बालरंगभुमीच्या व्यासपीठावर दिवाळीची गाणी भक्तीगीते, भावगीते सादर केली. याकार्यक्रमाची सुरुवात गार्गी जोशी हीच्या गणेशवंदना या भरतनाटय नृत्याने झाली. यानंतर अंध असूनही दिवाळीचा आनंद व्यक्त करणारे गीत आली माझ्या घरी दिवाळी हे गीत अत्यंत मधुर स्वरात विशाखा वरकटे हिने सादर केले तर अर्णव खडकीकर याने निघालो घेवून दत्ताची पालखी हे गीत सादर केले. यात धुतेकर संगीत विद्यालयाच्या विद्यार्थी तन्वी दहिवाळ, सचिन मार्गे संगीत विद्यालयाचे विद्यार्थी, नरहरी दळे संगीत विद्यालयाचे विद्यार्थी, देव मुळे, वेदांत काजळे, स्वराली साळुंके, देवकी साळुंके, शांभवी राउत, आदीती मेहकर, वैभवी वायकर, तन्वी घिगे, सुहास जाजु, गौरव माने, अनन्या सरवदे, इशा सरवदे या कलावंतानी अप्रतीम अशी श्रवणीय गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालकलावंत सुरभी निराळे हिने केले. याप्रसंगी सहभागी बालकलावंताना प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी दि. १५ ऑक्टोंबर रोजी घेण्यात आलेल्या पणती रंगवणे व गडकिल्ले बनवणे या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. याकार्यक्रमाला डॉ. सौ. दिपाताई पान २ वर

# नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केली शालेय विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी

बीड। प्रतिनिधी

शिक्षण जितके आवश्यक, तितकेच आरोग्यही महत्त्वाचे असते, या भावनेतून तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. हा उपक्रम तुलसी नर्सिंग कॉलेज आणि माता रमाई नर्सिंग कॉलेज, बीड यांच्या संयुक्त सहकार्याने सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी यशस्वीपणे पार पडला.

शिबिराचे प्रमुख मार्गदर्शन तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.डी. राऊत यांनी केले. या शिबिरात विद्यार्थ्यांचे वजन, उंची, दृष्टी, दात तसेच आरोग्य तपासण्यात आले. डॉ. पल्लवी धेंडे आणि विद्यार्थी नर्सेसनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधत संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि स्वच्छतेचे महत्त्व सोप्या भाषेत समजावले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शाळेच्या परिसरात उत्साह आणि जागरूकतेचे वातावरण निर्माण झाले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. अबरार पठाण, प्रा. प्रतीक्षा वेडे, प्रा. सुप्रिया वाघमारे, प्रा. मिलिंद वडमारे, प्रा.इनामदार सोहेल आणि प्रा. राठोड आकाश यांनी परिश्रम घेतले.

# प्रा.डॉ.सिद्धार्थ मस्के यांचा गुजरात उच्च शिक्षण विभागाकडून गौरव

**माजलगाव । प्रतिनिधी**

केसापुरी वसाहत येथील प्रा.डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के सोसायटी फॉर क्रियेशन अपोर्च्युनिटी थ्रू प्रोफीशीयंसी इन इंग्लिश प्रकल्प उच्च शिक्षण विभाग गुजरात आणि क ॅ ि ब ्र ज विद्यापीठ,यू.के.यांच्या संयुक्त उपक्रमा अंतर्गत दक्षिण गुजरात विभागातून गर्वनमेंट आर्टस्? अँड कॉमर्स कॉलेज,अहवा जि. डांग यास पहिली रँक प्राप्त झाल्याबद्दल या विशेष कामगिरीसाठी उच्च शिक्षण विभाग,गुजरात द्वारा गर्वनमेंट आर्टस्? अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.यु.के.गांगुर्डे व आहवाचे स्कोप समन्वयक डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के यांना प्रमाणपत्र तसेच कॉलेजला मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला.तसेच उत्तीर्ण विदयार्थ्यांना केंब्रिज विद्यापीठचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आला असून त्यांना



सौ.वृंदावणी श्रीहरी मस्के, डॉ.सविता सिद्धार्थ मस्के,पदमीन सिताराम मस्के,संध्या विजय मस्के,सुजात सिद्धार्थ मस्के,सुजस सिद्धार्थ मस्के,समरजित विजय मस्के,सुनील मस्के,अनिल मस्के, कलावती श्रीकांत मस्के,प्रा.शिवदास घाडगे,उत्तमराव वाघमारे,प्रा. प्रसेंजित मस्के,भागवत सिरसट, ऍड.रविकांत उघडे यांच्यासह सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रंजेगाव येथील दोनशे शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन तर्फे मोफत बियाण्यांचे वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील रंजेगाव येथील पूरग्रस्त आणि अतिवृष्टी बाधित दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात आले. नाम फाउंडेशन तर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात येत आहे. रंजेगाव येथील या शेतकऱ्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते बियाणांचे वाटप करण्यात आले.



बीड जिल्ह्यातील कुर्ला या गावात वाटप करण्यात आल्यानंतर माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथे देखील नाम तर्फे बियाण्याचे वाटप करण्यात आले. रंजेगाव येथील दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करताना गावातील रहिवाशी सामाजिक कार्यकर्ते आसाराम आबूज यांनी विशेष मेहनत घेतली.

आसाराम आबूज यांना या कामात एकनाथ आबूज रामनाथ आबूज यांनी मदत केली. शेतकऱ्यांना आबुज सर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी प्रत्येक शेतकऱ्यांना ३० किलो हरभऱ्याच्या बिया सह ज्वारीचे बी देखील देण्यात आले. बियाण्यांची पेरणी करून शेतकऱ्याने चांगले उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करावा. तसेच गावात पाणीसाठा वाढावा यासाठी नदी खोलीकरण अथवा गाळ काढण्याचे काम करावे त्यासाठी पोकलेन मशीन मोफत देण्यात येतील, असे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी यावेळी केले.

# राहुल गवळी यांची राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेशाध्यक्ष मा.खा. सुनिल तटकरे यांच्या शिफारशीनुसार बीड शहराध्यक्षपदी राहुल अशोक गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीच्या निमित्ताने बीडमध्ये एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, अशोक हिंगे, नगरसेवक अमर नाना नाईकवाडे, फारुक पटेल, विनोद मुळूक, रंजित बनसोडे, रमेश चव्हाण, महेश धांडे, रोहन गायकवाड, माऊली गायकवाड, पक्षाचे प्रवक्ते भागवत तावरे, अजिंक्य आनेराव आदी मान्यवर उपस्थित होते.



सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत राहुल गवळी यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांचे पुष्पगुच्छ व सत्कार करून अभिनंदन केले आणि आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी बोलताना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "राहुल गवळी यांच्या खांद्यावर पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार करणे आणि संघटनात्मक बळकटी करणे ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे."

सत्काराला उत्तर देताना राहुल गवळी यांनी सांगितले, "माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल पक्षश्रेष्ठींचे मी मनःपूर्वक आभार मानतो. बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट करण्यासाठी मी विविध उपक्रम व संकल्पना राबवणार आहे. युवकांना जोडून पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहीन."

# धोंडे गटाचे अण्णासाहेब लांबडे यांचा आ.धस यांच्या नेतृत्वाखाली भाजपात प्रवेश



आष्टी । प्रतिनिधी

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका अवघ्या काही महिन्यावर येऊन ठेपल्या असताना तालुक्यामध्ये राजकीय घडामोडीला वेग येत आहे माजी आमदार भीमराव धोंडे हे देखील येणाऱ्या काही दिवसात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश करणार असल्याचे जवळपास निश्चित झाल्याचे दिसून येत आहे अद्वेदचंद्र निवासस्थानी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या उपस्थितीत बाजार समितीचे संचालक अण्णासाहेब लांबडे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी माजी सभापती अँड साहेबराव म्हस्के, युवा नेते जयदत्त भैया धस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यशवंत खंडागळे कडा शहराचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर तसेच नाभिक संघटनेचे बाबुराव कदम ते देखील यावेळी उपस्थित होते जसं जशा निवडणुका जवळ येतील अशा राजकीय उलथापालती मतदार संघात होणारच आहे दैठणा गावातील अण्णासाहेब लांबडे हे बराच वर्षापासून भीमराव धोंडे यांच्याबरोबर काम करत होते.

# मृत्यूच्या दारातून लहान मुलाला जीवदान दिल्याबद्दल मुसाखान यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील चांदणी चौक परिसरात घडलेली एक घटना संपूर्ण शहराला भावूक करून गेली होती. शहरातील प्रसिद्ध समाजसेवक व भाजप नेते मुसाखान, नेहमीच्या कार्यात व्यस्त असतानाच अचानक त्यांना हृदय हेलावून टाकणारी घटना दिसली. दगडी छोट्या पुलावरून एक लहान मुलगा घसरून पाण्यात कोसळला आणि त्याच्या डोळ्यांसमोर मृत्यूचा महाभयंकर खेळ उभा राहिला.पाणी खोल होते, प्रवाहही तीव्र होता. छोटा मुलगा जीव वाचवण्यासाठी तडफडत होता. त्या क्षणी कुणीही पुढे सरसावणे म्हणजे स्वतःच्या जीवाशी खेळणे होते. याचवेळी मुसाखान यांनी त्या वाचवणाऱ्या मुलांसह त्या मुलाला वाचवलं याच कारणाने एम के ग्रुप च्या वतीने त्यांना शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी एम के ग्रुपचे मकसूद खान, बीड प्रसार चे संपादक समीर काझी, इसाक सर, रिजवान लाला, आमेर खान, शहाजमा खान, शाहिद खान. कबीर दादा. बुरहान काझी आदी उपस्थित होते.

# वडवणी येथे बळीराजा महोत्सवानिमित्त भव्य समता दिंडीचे आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**

सम्राट बळीराजा महोत्सव समिती वडवणी यांच्या वतीने बुधवार दि.२२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ०८:३० वाजता जिजामाता चौक ते सावित्रीबाई फुले स्मारकापर्यंत संविभागी महासम्राट बळीराजा महोत्सव-२०२५ व भव्य समता दिंडी चे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, इडा पिडा टाळू या बळीच राज्य आणूया.!

सम्राट बळीराजा महोत्सव समिती वडवणी यांच्यावतीने संविभागी महासम्राट बळीराजा महोत्सव-२०२५ व भव्य समता दिंडी चे आयोजन बुधवार दि.२२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ८:३० वाजता वडवणी शहरातील जिजामाता चौक, डॉ.आंबेडकर चौक,वसंतराव नाईक चौक,संविधान चौक, राजर्षी शाहू महाराज चौक, जिवाजी महाले चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, महात्मा फुले चौक,सावित्रीबाई फुले स्मारकापर्यंत होणार आहे यामध्ये बैलगाडी, शेतकऱ्यांची वेशभूषेत विद्यार्थी,कृषी संस्कृतीशी निगडित अवजारे, महापुरुषांचे,शेतकऱ्यांचे कृषी संस्कृतीशी निगडित घोषवाक्याचे फलक व घोषणा असतील तरी समस्त शेतकऱ्यांनी,कष्टकऱ्यांनी व माता भगिनींनी हवाहवासा वाटणाऱ्या अशा आपल्या बळीराजा महोत्सवानिमित्त होणाऱ्या भव्य समता दिंडीत आपण सर्व जाती धर्मातील कुटुंबाने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक पान २ वर

# क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या वतीने जयदत्त क्षीरसागर यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आदरणीय अण्णासाहेब यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी संघटनेने पदविधर नोंदणी अभियानात केलेल्या उत्साही, संघटित आणि प्रभावी कार्याची सविस्तर माहिती अण्णासाहेबांना देण्यात आली. या कार्याची दखल घेत अण्णासाहेबांनी संघटनेच्या कार्याबद्दल समाधान आणि कौतुक व्यक्त केले. तसेच पुढील काळात संघटनेने शिक्षण आणि शिक्षकवर्गाच्या प्रगतीसाठी आणखी सक्रीय भूमिका निभवावी, असे मार्गदर्शनही



त्यांनी केले. या भेटीदरम्यान होऊ घातलेल्या नगरपरिषद निवडणुकीसंदर्भातही सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस संघटनेचे संस्थापक सचिव श्री. शाहेद कादरी सर, मौलाना हाफिज साहेब शहर काझी, समाज सेवक पाशा भाई, डॉ. शेख वसिम्? , श्री. अजीज सर, प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड, श्री. साजेद भाई, श्री. वाघमारे सर, श्री. सतीश पवार सर, श्री. चव्हाण सर तसेच अन्य मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.या भेटीत उत्साह, ऐक्य आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. संघटनेच्या कार्याला पुढील काळात नवी दिशा आणि ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# क्रांतिकारी लाईनस्टाफ सेनेच्या वार्ता फलकाचे अनावरण

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील पाटोदा येथेक्रांतिकारी लाईनस्टाफ सेनेच्या वार्ता फलकाचे अनावरण आणि कामगार मेळावा तसेच जाहीर प्रवेश सोहळा दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी पाटोदा उपविभाग येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी शाखा उद्घाटन लाईनस्टाफ हृदयसम्राट संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रशांत लबडे पाटील तसेच आष्टी, पाटोदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. सुरेश (आण्णा) धस साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला पाटोदा उपविभागातील लाईनस्टाफ बांधवांचा मोठा




प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या आयोजनात पाटोदा उपविभागीय पदाधिकारी, तसेच संघटनेचे केंद्रीय सदस्य श्री. रवी झाडे, श्री. सोहन लाड, केंद्रीय प्रवक्ते श्री. लाला सय्यद, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक पदाधिकारी श्री. अमीर भाई मदनी, लातूर झोन अध्यक्ष श्री. अशोक धोंगडे, झोन सचिव श्री. महादेव पाटील, श्री. किसन पाचरणे (धाराशिव मंडळ अध्यक्ष), बीड मंडळ अध्यक्ष श्री. एजाज भाई शेख, सचिव श्री. अश्वलिंग बरे, उपाध्यक्ष श्री. रमेश चौरे, कार्याध्यक्ष श्री. गजानन सोळुंके, कोषाध्यक्ष श्री. गोकुळ गायकवाड, महिला प्रतिनिधी सौ. अस्मिता रायमल, बीड विभागीय अध्यक्ष श्री. रजनीकांत तागड, सचिव श्री. गणेश कागदे, सहसचिव श्री. राजेंद्र जाधव, कोषाध्यक्ष श्री. सतीश काकडे, मुख्य संघटक श्री. दत्तात्रेय माटे, कु. रितिका कसबे, पाटोदा उपविभागीय पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सोसायट्यांना हायकोर्टाचा मोठा दिलासा !

## नर्विकासासाठी आता उपनिबंधकांच्या परवानगीची गरज नाही

पुणे । प्रतिनिधी

गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास आणि स्वयंपुनर्विकासाच्या प्रक्रियेला गती देणारा आणि संस्थांना मोठा दिलासा देणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. गृहनिर्माण संस्था पुनर्विकासासाठी त्यांना सहकार विभागाच्या उपनिबंधक यांच्या कार्यालयाची परवानगी घेणे आता बंधनकारक नसेल, असा स्पष्ट निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे.

राज्य शासनाने ४ जुलै २०१९ रोजी काढलेल्या एका परिपत्रकामुळे गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासासाठी उपनिबंधक कार्यालयाची परवानगी घ्यावी लागते की नाही, याबद्दल मोठा संभ्रम निर्माण झाला होता. हजारो गृहनिर्माण संस्था या संभ्रमामुळे पुनर्विकास प्रक्रियेत अडकून पडल्या होत्या. यावर, उच्च न्यायालयात अपिल दाखल झाले होते. या सुनावणीमध्ये उच्च न्यायालयाने हा नुकताच महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात उपनिबंधक, सहकारी संस्था



यांच्या भूमिकेची स्पष्टता केली आहे. पुनर्विकासाच्या कामात हस्तक्षेप करण्याचा अधिकार उपनिबंधकांना नाही. मात्र, पुनर्विकासाचे कामकाज 'पारदर्शकपणे' होते आहे की नाही, हे पाहण्याची भूमिका त्यांची राहील. असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. प्रत्येक सभासदाला विशेष सर्वसाधारण सभा नोटीस जाते की नाही, आर्किटेक्ट, प्रकल्प सल्लागार निवड हे सर्व कामकाज पारदर्शकतेने होते की नाही हे पाहणे ही त्यांची भूमिका असेल. हस्तक्षेप करण्याचा अधिकार उपनिबंधक सहकारी संस्था यांना नाही. असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे.याविषयी माहिती देताना महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी सांगितले आहे. उच्च न्यायालयाने हा महत्त्वाचा निर्णय दिलेला आहे. या आदेशाबद्दल आम्ही न्यायालयाचे आभार मानतो.

न्यायालयाने या सुनावणी दरम्यान अनेक महत्त्वाच्या गोष्टींबद्दल निरिक्षणे नोंदविली आहेत. पुनर्विकासाच्या प्रक्रियेत मध्यस्थ लोक गैरफायदा घेत असून, त्यामुळे सभासदांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकारचा गैरवापर किंवा हस्तक्षेप निदर्शनास येत असल्यास, तो ताबडतोब थांबवावा, असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने सहकार विभागाला दिले आहेत.महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महासंघ राज्यातील सुमारे १ लाख २६ हजार ५०० गृहनिर्माण संस्थांचे आणि २ लाख अपार्टमेंट्सचे प्रतिनिधित्व करतो. यापैकी सुमारे ८० टक्के संस्था मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि पुणे या महानगरांमध्ये आहेत. सध्या ५० टक्के गृहनिर्माण संस्था पुनर्विकास, स्वयंपुनर्विकास करण्याच्या प्रयत्नात आहेत. या निर्णयामुळे त्यांच्या पुनर्विकास प्रक्रियेतील मोठा कायदेशीर अडथळा दूर झाला आहे.

# जिल्ह्यातील मतदार याद्यांवर हरकतींचा पाऊस! ५८ हजारांहून अधिक हरकती

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील १४ नगर परिषदा आणि ३ नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रभाग निहाय मतदान केंद्र निश्चित करून मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द केली होती. मतदान केंद्रनिहाय यादींवर एकूण ५८ हजार ६९७ हरकती दाखल झाल्या. यात मुख्यत्वे प्रभाग बदलल्याच्या हरकती असून याबाबत प्रत्यक्ष मतदाराच्या घरी भेट देऊन त्यावर निर्णय घेण्यात येत आहे. आतापर्यंत १४ हजार ४१८ हरकती निकाली काढण्यात आल्या आहेत.

नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रशासनाने ८ ऑक्टोबर रोजी प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली होती. त्यावर हरकती देण्यासाठी १३ ऑक्टोबरची मुदत



### प्रशासन थेट मतदारांच्या दारी

होती. मात्र, त्याला चार दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार शुक्रवारी (दि. १७) ही मुदत संपली. सर्वाधिक १८ हजार २३४ हरकती एकट्या फुरसुंगी उरुळी देवाची हद्दीतून आल्या. या हरकतींमध्ये ९५ टक्के हरकती एका प्रभागातील मतदाराचे नाव दुसऱ्याच प्रभागात आल्याबाबत आहेत.

त्यामुळे या हरकतींचे निराकरण करण्यासाठी मतदाराच्या घराची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक नगरपरिषद व नगरपंचायतीमार्फत पर्यवेक्षक, लिपिक व बीएलओ यांचे पथक नेमून प्रत्यक्ष पाहणी करून हरकती निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे. यासाठी संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकाऱ्यांना प्राधिकृत केल्याची माहिती जिल्हा प्रशासनातील नगरविकास विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी दिली.

# पुरंदरमध्ये 'गुणवंतां'चा शोध सुरू ; जालिंदर कामठेंच्या पुढाकारातून दर महिन्याला दोन व्यक्ती होणार सन्मानित

सासवड - पुरंदर तालुक्यात अनेक नामवंत व्यक्तींनी या मातीत राहून समाजासाठी अनेक वर्षे मोठे काम केले आहे. अशा व्यक्तिमत्त्वांचा शोध घेत त्यांचा सन्मान करणे ही काळाची गरज आहे, 'पुरंदरचे गुणवंत' या उपक्रमाच्या माध्यमातून समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्याची परंपरा सुरू झाली आहे. या पुरस्कारातून केवळ सन्मानच नव्हे, तर तरुण पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श मांडण्याचा उद्देश असल्याचे मत जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामठे यांनी व्यक्त केले.

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी 'पुरंदरचे गुणवंत' या नावाने दोन व्यक्तींना सन्मानित केले जाणार असल्याची माहिती जालिंदर कामठे यांनी दिली.सासवड (ता. पुरंदर) येथील मार्केट कमिटीच्या माने कॉम्प्लेक्स येथे जालिंदर कामठे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पंचायत समितीचे माजी सदस्य बबनराव कामथे व प्रगतशील शेतकरी अप्पासाहेब पुरंदरे यांना 'पुरंदरचे गुणवंत' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजवादाचे ज्येष्ठ



अभ्यासक रावसाहेब पवार यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह, विठ्ठल-रखुमाई मूर्ती, शाल व श्रीफळ यांचा समावेश होता.यावेळी भानुदास जगताप, सचिन पठारे, महेश जगताप, दत्ता राऊत, शिवाजी साळुंखे, मनोहर कामठे, कुंडलिक मेमाणे, श्रीकांत देशपांडे, मंगल कामथे, माऊली चव्हाण, प्रीती जगताप, राजेंद्र जाधव, नवनाथ कामथे, प्रमोद जगताप, समीर कामथे, धनंजय कामथे, नानासाहेब कदम, बबन तावरे, विजय पवार, बाळासाहेब फुले, उल्हास जाधव, सुभाष धुमाळ, विकास कामथे उपस्थित होते.नंदकुमार जगताप यांनी प्रास्ताविक केले. संदीप देवकर यांनी आभार मानले.

ज्येष्ठ साहित्यिक व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवड शाखेचे माजी अध्यक्ष रावसाहेब पवार म्हणाले, पुरंदर तालुक्याला आध्यात्मिक, धार्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक व राजकीय असा समृद्ध वारसा लाभला आहे. या सान्निध्यात वाढलेले अनेक लोक आपल्या कर्तृत्वाने मोठे झाले आहेत. अशा थोर व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना 'पुरंदरचे गुणवंत' पुरस्काराने सन्मानित करण्याचा उपक्रम सुरू झाल्याने गुणवंतांचा इतिहास तरुणांसमोर येईल व त्यांना प्रेरणा मिळेल.

# कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार ; वानवडी पोलिसांकडून सहा जण गजाआड

पुणे । प्रतिनिधी

कोंबड्यांची झुंज लावून त्यावर जुगार खेळण्याचा प्रकार वानवडी पोलिसांनी उघडकीस आणला. घोरपडीतील एम्प्रेस गार्डनपासून काही अंतरावर मोकळ्या जागेत कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळला जात होता.वानवडी पोलिसांनी कारवाई करून या प्रकरणी सहा जणांना अटक केली. आरोपींकडून झुंजीसाठी वापरण्यात आलेले सहा कोंबडे, पाच मोबाइल संच, तीन दुचाकी, पिशव्या, दोन हजार ५८० रुपये असा पाच लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अमोल सदाशिव खुर्द (वय ४७, रा. रविवार पेठ), मंगेश आप्पा चव्हाण (वय ५५, रा.



भवानी पेठ), निखिल मनीष त्रिभुवन (वय २०), अमीर आयूब खान (वय २८, दोघे, रा. घोरपडी), सचिन सदाशिव कांबळे (वय ४२, रा. भवानी पेठ), प्रणेश गणेश पॅरम (वय २७, रा. लष्कर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.याप्रकरणी सहा आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देणे अधिनियम कलम ११ (इ), (न) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घोरपडीतील एम्प्रेस गार्डन परिसरातील एका बंगल्याजवळ असलेल्या मोकळ्या जागेत कोबड्यांची झुंज लावून त्यावर जुगार खेळण्यात येत असल्याची माहिती वानवडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी गोपळ मदने आणि अमोल पिलाणे यांना मिळाली.त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे कारवाई केली. त्यावेळी तेथे कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळण्यात येत असल्याचे दिसून आले. आरोपी कोंबड्यांची झुंज बघण्यासाठी आलेल्या काही जणांना पैसे लावण्यास सांगत होते.पोलिसांनी सहा जणांना अटक केली. त्यांनी शहरातील अन्य ठिकाणी कोंबड्यांची झुंज लावल्याचा संशय असून, त्यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. कोंबड्यांची ने-आण करण्यासाठी त्यांनी तंगुसपासून बनविलेल्या पिशव्यांचा वापर केल्याचे आढळून आले आहे.

# पुन्हा खाकी वर्दीवर हात! वाहतूक नियम मोडणाऱ्या ट्रक चालकाकडून पोलिसालाच मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

पोलिसांवरील हल्ल्याच्या घटना वाढत असून आता मार्केट यार्डमध्ये पोलीस हवालदाराला ट्रकचालक आणि साथीदारांनी मारहाण केली आहे. याप्रकरणी ट्रकचालकासह तिघांना अटक केली आहे.सुमीत सुभाष सरकटे ( ३४, रा. खराडी, नगर रस्ता), अक्षय नानासाहेब शिंदे ( ३०, रा. तळवडे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर), मनजीत सुभाष कांबळे ( २८, रा. घोरपडी गाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस हवालदार महेश सुभाष साळुंखे ( ३९, रा. बिबवेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

हवालदार साळुंखे हे बंडगार्डन पोलीस ठाण्यात नियुक्तीस आहेत. ते गुरुवारी (१७ ऑक्टोबर) रात्री साडेदहाच्या सुमारास कामावरून बिबवेवाडीतील घरी निघाले होते. मार्केट यार्डातील वखार महामंडळ चौक ते गंगाधाम चौक दरम्यान ट्रक भरधाव वेगात निघाला होता. गंभीर स्वरूपाचा अपघात घडण्याची शक्यता होती. हवालदार साळुंखे यांनी ट्रकचालकाला मार्केट यार्डातील प्रवेशद्वार क्रमांक नऊजवळ अडविले. त्यावेळी जमलेल्या नागरिकांनी ट्रकचालकास मारहाण करण्याचा प्रयत्न केला. हवालदार साळुंखे यांनी जमावाला शांत केले.त्यानंतर ट्रकचालकाने साथीदारांना बोलावून घेतले. आरोपी अक्षय शिंदे आणि साथीदारांनी हवालदार साळुंखे यांना मारहाण केली. त्यांच्या डोक्यात हातातील कडे मारले. त्यानंतर आरोपी पसार झाले. साळुंखे यांनी तातडीने याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाल दिली. साळुंखे यांना ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारानंतर त्यांनी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पसार आरोपींना अटक केली असून, मार्केट यार्ड पोलीस तपास करत आहेत.

# पिंपरखेड-जांबूत परिसरात बिबट्याचा धुमाकूळ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड आणि जांबूत परिसरात पुन्हा एकदा बिबट्याने धुमाकूळ घातला असून, शुक्रवारी (१७ ऑक्टोबर २०२५) सायंकाळी घडलेल्या अनेक घटनांमुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतात काम करत असलेल्या प्रेरणा नरेंद्र बोंबे, शालेय विद्यार्थिनी कल्याणी गाढवे आणि गृहिणी सुलोचना वसंत बोंबे यांनी प्रसंगावधान राखून बिबट्याच्या हल्ल्यातून थोडक्यात बचाव केला. मात्र, या सलग हल्ल्यांमुळे वनविभागाच्या उपाययोजनांवर शेतकऱ्यांचा संताप वाढला असून, परिसरातील बिबट्यांची संख्या ३०० च्या घरात असल्याची चिंता व्यक्त होत आहे.शिरूर तालुक्यातील बेट भागात मागील आठ दिवसांपूर्वी (९ ऑक्टोबर २०२५) बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षीय चिमुकली शिवन्या बोंबे हिचा जीव गेला होता. या घटनेने परिसर हादरून गेला असून, वनविभागाने खडबडून जागे होऊन उपाययोजना सुरू केल्या. मात्र, शिवण्याच्या नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार देऊन दोन दिवसांपूर्वी (१५ ऑक्टोबर २०२५) बेल्हे-जेजुरी राज्य महामार्गावर सुमारे सहा तास रास्ता रोको आंदोलन केले. संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरून संताप व्यक्त केला. या आंदोलनानंतर वनविभागाने पिंजऱ्या लावण्यास सुरुवात केली, पण बिबट्याचे हल्ले थांबले नाहीत.

# आंबेडकरी चळवळीतील एक पर्व संपले ; ज्येष्ठ साहित्यिक-विचारवंत डॉ. सी. पी. थोरात यांचे निधन

पुणे । प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ साहित्यिक-विचारवंत डॉ. चंद्रकांत पिलाजी ऊर्फ सी. पी. थोरात (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्यामागे पत्नी आणि तीन कन्या असा परिवार आहे. थोरात यांच्या पार्थिवावर रविवारी कोरेगाव पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.ते भारत मोसम विज्ञान विभागातील सेवानिवृत्त शास्त्रज्ञ आणि बहुजन समाज पक्षाचे संस्थापक काशीराम यांचे जवळचे सहकारी होत. त्यांचे दोन शोधनिबंध आंतरराष्ट्रीय विज्ञान पत्रिकेमध्ये प्रसिद्ध झाले आहेत.



त्यांनी दक्षिण ध्रुवावरील हवामानाचे अंदाज पुण्यातून देण्याचा प्रकल्प सुरू केला. त्यामुळे देशाच्या दक्षिण ध्रुवावरील मोहिमेला प्रोत्साहन मिळाले. १९९७ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती.थोरात यांचे आई-वडील आंबेडकरी चळवळीत सक्रिय असल्याने लहानपणापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास त्यांना लाभला. बी. एस्सीच्या शेवटच्या वर्षापासून द बुद्ध अँड हिज धम्मा या इंग्रजी ग्रंथातील बुद्ध धम्म पुण्यातील लोकांना पहिल्यांदा समजावून सांगण्याचे कार्य त्यांनी केले.

इंग्लंड येथील विद्वान भंते संघरक्षितजी यांच्याकडून त्यांना बाबासाहेबांचा बुद्ध धम्म शिकावयास मिळाला. मुंबईच्या कुलाबा वेधशाळेत १९६१ ते १९६७ फेब्रुवारीपर्यंत कार्यरत असताना त्यांनी सभा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे म्हणून आंदोलन केले होते. १९७१ पासून कोरेगाव भीमा क्रांती स्तंभास मानवंदना देण्याचा कार्यक्रम त्यांनी सुरू केला.विदर्भ वगळता राज्यातील सर्व जिल्ह्यांत प्रशिक्षण शिबिरे घेऊन त्यांनी शेकडो कार्यकर्ते बामसेफ संघटनेमध्ये समाविष्ट केले.थोरात हे काशीराम यांचे निकटचे सहकारी होते. त्यांची काशीराम : मनुवाद को चुनौती, पुणे समझौता, सम्राट अशोक, काशीरामके साथ आंबेडकरी मिशन ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

# जैन बोर्डिंग होस्टेल व्यवहाराशी माझा संबंध नाही! मुरलीधर मोहोळांनी कागदपत्रांसह केला मोठा खुलासा

**पुणे । प्रतिनिधी**

शेठ हिराचंद नेमचंद जैन बोर्डिंग होस्टेलच्या व्यवहाराशी संबंधित बांधकाम व्यावसायिकाच्या भागीदारीतून मी बाहेर पडल्यानंतर ११ महिन्यांनी हा व्यवहार झाल्याने या व्यवहाराशी माझा संबंध येत नाही. त्यामुळे राजू शेट्टी यांनी माहिती न घेताच चुकीचे आरोप करू नयेत. याबाबतची वस्तुस्थिती पडताळल्यास ही बाब समजेल, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी स्पष्ट केले.पुण्यात रविवारी माध्यमांशी संवाद साधताना मोहोळ म्हणाले, की ३०-३२ वर्षे सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करत असताना असे चुकीचे आरोप झाल्यास एखाद्या कार्यकर्त्याचे मनोबल खच्ची होते.

एखाद्याचे करिअर उद्ध्वस्त होऊ शकते. पुणेकरांचा खासदार असल्याने माझ्यावर होत असलेल्या आरोपांवर स्पष्टीकरण देणे मला गरजेचे वाटले, म्हणून मी माझी बाजू मांडली.जैन बोर्डिंगचे खरेदीखत, व्यवहार गोखले बिल्डर्स या बांधकाम व्यावसायिकाने केला. मी गोखलेंचा भागीदार आहे, असा आरोप माझ्यावर केला. मात्र, माझ्या लोकसभा निवडणुकीच्या



प्रतिज्ञापत्रातही मी तसे घोषित केले होते. माझी शेती, तसेच भागीदारीतील बांधकाम व्यवसाय मी स्पष्टपणे नमूद केले होते, असे मोहोळ म्हणाले.गोखले इस्टेट एलएलपी आणि गोखले फ्यूचर एलएलपी या दोन कंपन्यांमध्ये मी भागीदार होतो. यातील एक संस्था २०२२ आणि दुसरी २०२३ मध्ये स्थापन झाली. या दोन्ही कंपन्यांमध्ये एकही रुपयाचा व्यवसाय, व्यवहार झालेला नाही, ही माहिती कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटवरून कोणालाही पडताळून पाहता येईल. केंद्रात मंत्री झाल्यानंतर नोकरी करता येत नाही, भागीदारी करता येत नाही. त्यानुसार या दोन्ही भागीदारी संस्थांमधून मी २५ नोव्हेंबर २०२४ रोजी राजीनामा देत बाहेर पडलो, असे मोहोळ यांनी सांगितले.

जैन बोर्डिंग ट्रस्टची बैठक १६ डिसेंबर २०२४ रोजी झाली. त्यात बोर्डिंगच्या पुनर्विकासासाठी विकसकाला देण्याचा निर्णय घेतला. २० डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी पुणे आणि मुंबईतील काही वर्तमानपत्रांत निविदा प्रसिद्ध केली. पुढे गोखले बिल्डर्सने आठ ऑक्टोबर २०२५ रोजी जैन बोर्डिंग ट्रस्टसोबत खरेदीखत केले. मी या भागीदारी संस्थांमधून बाहेर पडल्यानंतर ११ महिन्यांनी हा व्यवहार झाला. मग यात माझा संबंध येतोच कुठे, असा सवालही मोहोळ यांनी केला.

शेट्टी यांनी नुरा कुस्ती खेळू नये..

राजू शेट्टी यांना चुकीची माहिती देण्यात आली. त्यांनी शहानिशा न करताच बेछूट आरोप केले. त्यांनी मला विचारले असते, तर मी त्यांना वस्तुस्थिती कागदपत्रांसह दाखवली असती. त्यांच्यावर माझा आक्षेप नाही. त्यांनी खरी कुस्ती खेळावी, नुरा कुस्ती नव्हे. ते मला नुरा कुस्तीचे खेळाडू वाटतात. दोन्हींतला फरक पुणेकर आणि कोल्हापूरकर चांगलाच जाणतात, असा उपरोधिक टोलाही मोहोळ यांनी लगावला.

# वीटभट्टी मालकांनी ३२ परप्रांतीय मजुरांना डांबले ; जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने कारवाई

इंदापूर । प्रतिनिधी

उत्तर प्रदेश राज्यातून वीट भट्टी कामासाठी आलेल्या कामगारांचा मुकादम वीट भट्टी मालकांकडून कामाचे आगाऊ पैसे घेऊन निघून गेल्याने तब्बल २० विटभट्टी मजुरांना व त्यांच्या बारा लहान मुलांना असे एकूण ३२ जणांना नजर कैदेत ठेवलेल्या कामगारांना जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने इंदापूर तहसील व पोलीस प्रशासनाने सुटका करीत चार जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

वेदप्रकाश पूर्ण नाव पत्ता माहीत नाही,सचिन अशोक शिंदे,राहणार - इंदापूर,कुमार गोकुळ दिवसे,राहणार नरुटवाडी तालुका इंदापूर आणि राहुल नारायण शेटे,राहणार भांडगाव तालुका इंदापूर जिल्हा पुणे अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे असूनशाहरुख गुलाब शाह हसन( वय २५ वर्षे)राहणार जोगीपूर,तालुका चंदौशी जिल्हा हसनपुर, उत्तरप्रदेश याने इंदापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

उत्तर प्रदेशच्या जिल्हाधिकारी व कामगार आयुक्त तसेच जनसाहस या संस्थेला यांना



बंदी करून नजर कैदेत ठेवल्याचे पत्रव्यवहार करीत कळवल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली.मुकादमाला दिलेले पैसे भेटत नाही तोपर्यंत सर्व कामगारांनी या ठिकाणी काम करावे लागेल तसेच इथून तुम्ही जाऊ शकत नाही असे म्हणत त्यांची अडवणूक करून त्यांना जाण्यास विरोध करीत नजर कैदेत ठेवत त्यांच्याकडून काम करवून घेतले जात होते.

इंदापूर तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासनाने इंदापूर नरुटवाडी आणि भांडगाव,ता.इंदापूर, या ठिकाणाहून मंगळवारी १४ ऑक्टोबर ते शनिवारी १८ ऑक्टोबर पर्यंत ३२ पैकी दहा पुरुष दहा महिला आणि बारा लहान मुले या सर्वांना प्रशासकीय भवनातील तहसील कार्यालयाच्या आवारात राहण्याची जेवणाची व्यवस्था केली होती. शनिवारी सायंकाळी या सर्वांना खाजगी वाहनाने उत्तर प्रदेश कडे रवाना करण्यात आले.पुढील तपास इंदापूर पोलीस करीत आहेत.